

# श्री साईलीला

☆ शिरडी संस्थानचे अधिकृत मासिक ☆

या अंकांत—


- बाबांचा गोहिला
- स्वामी विवेकानंद-शिष्या
- कर्मातील आनंद
- ज्ञानदेव आणि चांगदेव
- ज्ञानदेवाचा अमृतानुभव
- श्रद्धा आणि सबुरी
- बाबांची शिकवण
- श्री दत्तस्तोत्र
- डाकोरचे संत रामदास
- ४८ वा पुण्यतिथी महोत्सव
- शिरडी वृत्त



मत ५० पैसे

जानेवारी १९६७

स्थापना १९२६




सर्व प्रकारचे दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू
सुप्रसिद्ध पेढी

**ई. आर. मालपेकर,**

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २ टे. नं. ३५५७३१



# श्री साई वाक्सुधा

तुमच्या वाट्यास कितीही मोठें वैभव आलेलें असो; तें चिरंतन काळ टिकणारें नाहीं याची जाणीव तुम्हीं आपल्या अंतःकरणांत सदैव बाळगली पाहिजे. आणि त्याप्रमाणें आपलें वर्तन ठेविलें पाहिजे. आपला हा जो देह आहे त्याचे चोचले आपण परोपरीनें करीत असतों. हा देह तरी आहे तसा नित्य टिकून रहाणारा आहे का? तो कधीं तरी विद्रूप व्हावयाचा व कधीं ना कधीं कोसळून पडावयाचा. याचीही जाणीव सर्व काळ ठेऊन न्याय-नीतीनें व धर्मानें वागण्याकडे आपण सर्व काळ लक्ष पुरविलें पाहिजे. वैभवश्रीचा किंवा देहाचा अभिमान माणसानें कधींही बाळगूं नये.

—श्रीसाईसच्चरित्


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४५ वें ]　　जानेवारी १९६७　　[ अंक १० वा

: संपादक :

श्री. बी. जी. पोतनीस

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ४४३२६१

: कार्यालय :

साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड.

प्लॉट नं. ८०४ बी, दा

# प्रिय वाचक—

मा णूस मोहापायीं आंधळा होत असतो. मी सुंदर आणि मी वैभवसंपन्न हा अभिमान काय कामाचा ? जें अशाश्वत त्याचा अभिमान आपण कां बरें बाळगायचा ? परंतु माणसाची व मोहाची जोंपर्यंत ताटातूट होत नाहीं तोंपर्यंत त्याच जाळ्यांत स्वतःला अडकून घेऊन तो त्या जाळ्यांत वारंवार गिरक्या घेत रहातो. नाना प्रकारच्या भोगांत गुरफटून त्यांतच समाधान मानून रहातो. असें आहे आम्हां सर्वसामन्यांचें जीवन.

अशाप्रकारच्या जीवनांतून जात असतां शाश्वत सुख कशांत आहे याचा आपण शांतपणें, शांतवेळीं विचार केला पाहिजे. ह्या संसारचक्रांत गिरक्या घेत असतां त्या चक्रांतून बाहेर पडून शाश्वत–सुखाचा मार्ग आपण शोधला पाहिजे. त्या मार्गाकडे जाण्याची बुद्धि उगाच वाटेल त्याला होत नाहीं. त्याला पुण्याई लागते. पुण्य–संचय गांठीं असावा लागतो. ही गांठ कशामुळें बांधतां येते. आपल्या गाठोला पुण्यसंचय केव्हां होतो ? पापकर्में करीत रहावयाचें, दुसऱ्यांचें अकल्याण कसें होईल याचें चिंतन व तदनुरूप आचरण करणाऱ्याजवळ पाप–संचयाशिवाय दुसरा कसला संचय होणार ? कधीं ना कधी याची जाणीव आपल्या मनाला झाली पाहिजे. ती जाणीव होण्याचा क्षण हाच आयुष्यांतील भाग्याचा क्षण होय. तो ज्याच्या वांट्यास आला तो भाग्यवान् होय.

देवाचें नामस्मरण करण्याची उपरति आपल्या मनाला झाली पाहिजे. ती होतांच माणूस नामस्मरणाकडे वळतो. नामस्मरण हेंच पुण्यांश जोडण्याचें साधें साधन आहे. नामस्मरणानें उत्तरोत्तर मनाचें पावित्र्य वाढत गेलें पाहिजे.

तुमच्याकडून पापकर्में घडलेलीं असोत; तुम्हांला कितीही ताप झालेला असो; किंवा तुमच्या वांट्याला कितीहि दैन्यवाणी स्थिति आलेली असो. तुम्हीं एकदां का नामस्मरणाची घट्ट कांस धरली म्हणजे तुम्हीं कशाचीहि भीति बाळगायला नको.


सर्वांच्याच वाट्याला सत्संगतीचा लाभ घडो न घडो, नामस्मरणाची संगति घडणें ही आपल्या हातची गोष्ट आहे नाहीं का ? त्यासाठीं कोणाच्या दारीं जायला नको किंवा वणवण भटकायलाहि नको. जें आपल्या हातचें आहे तें सोडून आपण पळत्याच्या पाठीं कां म्हणून लागायचें !

मग काय होईल ? कोणत्या सुखाचा लाभ होईल ? 'प्रसन्न होईल भगवंत । सर्व दुःखांचा करील अंत । होईल मायामोह शांत । सौख्य अत्यंत लाभेल ॥'

हें बाबांनीं आपल्या भक्तांना दिलेलें आश्वासन आहे. तें कधींहि खोटें ठरणार नाहीं. आपण श्रद्धा आणि सबुरी ह्या दोन गुणांची घट्ट कांस धरून जगांत वागलें पाहिजे.

बाबांचें हें आश्वासन ध्यानीं आणून तदनुरूप वागण्याचा आपण निर्धार करूं या.

—संपादक



## निराशा—

ह्याच जगाचा, अनुभव साचा—
कळले मज सार !
नैराश्याचे जिणे नराला—
खड्गाची धार !!
आशा-चंद्र-चकोरी लपली—
ज्याची घन-तिमिरीं !
मार्ग सकंटक त्या मनुजाचा—
पडतो वरचेवरी !!
निघे पांथ एकला जगीं जरी—
वनिच्या पंथाने !
नैराश्याची हंसत ज्योत दे—
साथचि प्रेमानें !!
आशा सरली ! जगांत नुरलें—
त्याचें वात्सल्य
भग्न विणेवर हृदया

# बाबाचा रोहिला

(लेखक : द. शं. टिपणीस)

सांख्य शास्त्रानें जग उत्पत्तीची मूळ तत्त्वें दोन धरलीं आहेत. एक पुरुष व दुसरें प्रकृती. प्रकृती ही त्रिगुणात्मक आहे. पुरुष अकर्ता (passive) तर प्रकृती कर्ती (active) आहे. प्रकृतीच्या ठिकाणी असलेल्या सत्व, रज, तम यांच्या साम्यावस्थेंत बिघाड झाल्यामुळें ही सृष्टी निर्माण झाली. सत्वाचा रजतमावर ताबा असतो. रजतमापैकीं एक उच्छृंखल झाल्यामुळें, त्याचें प्रमाण जास्त झाल्यामुळें साम्यावस्थेंत जो बिघाड झाला तो पूर्ववत् स्थापन करण्यासाठीं सत्व खटपट करूं लागतो. यामुळें आकर्षण व प्रतिसरण निर्माण होऊन मूळ शक्तीला गति प्राप्त होते. त्यांतून प्रथम परमाणू निर्माण झाले व परमाणूपासून पुढें ही सर्व सृष्टी निर्माण झाली. प्रकृतीचें प्रथमरूप महत् तत्त्व होय व महत्तत्त्वापासून अहंकार निर्माण झाला. महत्-तत्त्व हा विश्वअहंकार आहे व अहंकार हा व्यक्तिअहंकार आहे. महत्तत्त्वाचा वाढलेला पसारा म्हणजे ही सृष्टी होय व सृष्टींतील व्यक्तिगत अविष्कार घडवून आणणारा अहंकार आहे. महत् व अहंकार यांच्या सहाय्यानें प्रकृती आपलें कार्य करीत राहते. सत्त्वरजतमाच्या नाना मिश्रणानें अर्थात् परमाणू रुपानें ही सृष्टी व तिच्यांतील नाना तऱ्हेचे व वैचित्र्यपूर्ण प्राणी व पदार्थ तयार झाले आहेत. परमाणूंना गति आहे, कारण मूळ साम्यावस्थेंत बिघाड झाल्यामुळें जी गति निर्माण झाली त्या गतींतून परमाणू जन्मास आले. परमाणूचें घन व ऋण असे दोन प्रकार आहेत; कोणत्याहि पदार्थांतील घन व ऋण परमाणूंच्या प्रमाणांत व गतींत बदल केला कीं, निरनिराळे पदार्थ तयार होतात. आईनस्टाइन या शास्त्रज्ञानें लोखंडांत असलेल्या परमाणूंचे प्रमाण बदलवून लोखंडाचे सोन्यांत रुपांतर होऊं शकतें हे प्रयोग-शाळेंत सिद्ध केलें आहे. विज्ञानाच्या खोल पाण्यांत आपल्याला शिरण्याचें कारण नाहीं. जो कांहीं थोडा उल्लेख केला तो एवढ्याचसाठीं कीं, सांख्यांच्या सृष्टी उत्पत्तीच्या सिद्धांतला हळूं हळूं विज्ञानाचा पाठिंबा मिळत आहे हें दर्शविण्यासाठीं. सांख्य व वेदांत यांच्यांत 'मुळा'बद्दल मतभेद असला तरी त्या नंतरच्या सृष्टी उत्पत्तीचा क्रम दोघांचाहि जवळ जवळ सारखा आहे. सांख्यांची जी प्रकृति तीच वेदांताची माया. प्रकृतीचा पसारा म्हणजे हें विश्व असें सांख्य म्हणतात, तर मायेचें हें मृगजल म्हणजे विश्व असें वेदांती मानतात. व्यवहारांतील उदाहरण देऊन या सृष्टी

उत्पत्तीबद्दल बोलावयाचें तर दुधाचे उदाहरण घेऊं. दूध हे मूळ अव्यक्त ब्रह्म समजले तर त्यांच्यांतूनच बाहेर येणारे दही ही प्रकृति वा माया समजूं; कारण दह्यामुळें दुधाचे दूधपण पूर्ण लोपले जाते. दह्यावरून दुधाची कल्पना येऊं शकत नाहीं. घुसळल्यानें दह्याच्या परमाणुच्या प्रमाणांत व गतींत बदल झाला कीं, त्यांतून लोणी निर्माण होते. लोण्याच्या परमाणूच्या प्रमाणांत व गतींत अग्निमुळें बदल झाला कीं, तूप होते व त्या तुपाच्या नानाप्रकारच्या मिश्रणानें अनेक स्वादिष्ठ व रुचकर अशीं पक्वान्नें होतात. या उदाहरणावरून ही वैचित्र्यपूर्ण सृष्टी कशी निर्माण झाली असावी याची साधारण कल्पना येऊं शकेल. दही, लोणी व तूप ही दुधाचीच आहेत, पण ती मात्र दूध नव्हेत. एवढेच नव्हे तर तीं दुधापासूनच झालीं आहेत त्यांचे मूळरूप दूधच होतें अशी अंधुक कल्पनाही अज्ञानी माणसाला येणार नाहीं. अशीच कांहींशी अवस्था सृष्टीबद्दल आपलीहि आहे. प्राणीमात्रासह सर्व सृष्टी ब्रह्माचाच अंश, अविष्कार आहे. सर्वांत ब्रह्म आहे म्हणून कांहीं सर्व ब्रह्म आहे असें मात्र नव्हे. यामुळें सृष्टीवरून ब्रह्माची कल्पना करतां येणार नाहीं. लोणी वा तूप खाल्ल्यानें त्याचें मूळरूप जें दूध त्याची कां आपणांस चव लागणार आहे?

आपणासमोर दिसणारा हा वैचित्र्याचा संसार प्रकृतीचा, मायेचा आहे. या मायेसंबंधी आधुनिक विज्ञान काय म्हणते तें लक्षांत घेण्याजोगे आहे. “ शक्ति नांवाची जी काय गोष्ट असेल तिचीच रेडियेशन (बाहेर पडणारी शक्ति) व पदार्थ ही निरनिराळी दोन रुपें आहेत. म्हणजे जड पदार्थ व शक्ति यांत मूलतः खराखरी घटकांचा फरक नाहीं. केवळ ते घटक कोणत्या परिस्थितीत वावरतात एवढाच प्रश्न आहे. परिस्थितिनुरुप कधीं हीच शक्ति रेडियेशन तर कधीं जड पदार्थ म्हणून दिसते... यामुळें शक्तीचें वास्तवीक मूळस्वरूप काय आहे हें समजणें शक्य नाहीं...हें जग हें एका अव्यक्त शक्तीचें व्यक्त रूप आहे. ही अव्यक्त अज्ञेय शक्तिच एकदा हें तर एकदा सोंग घेऊन ( मॅटरमध्यें एनर्जी वावरती करून ) या विश्वाचा पसारा आपणापुढें मांडते आणि आपण हें नाटक खरें मानून लालचावतो.” सायन्स ते समाधी ( matter bottled up energy.) या नाटकातील मुख्य नटीला माया म्हणतात. तिच्या नाचाला आपण भुलतो व ती आपणास सारखी भुलवींत ठेवते.

मूळच्या साम्यावस्थेत बिघाड होऊन ही विश्वउत्पत्ती झाल्यामुळें विश्वातहि आपल्या दृष्टीला नाना तऱ्हेचे बिघाड झालेले दिसत असले तर नवल नाहीं. समान असमानता, नाना विरोधाभास, वैचित्र्य, विक्षिप्तपणा, आश्चर्य यांनीं हें जग खच्चून भरलेलें आहे. या अफाट सृष्टीकडे पाहून तिच्या वैचित्र्याचा विचार करणें मोठें मनोरंजक आहे. एकत्वाचे द्वित्व होऊन हें जग निर्माण झाल्यामुळें जगांत जिकडे तिकडे द्वित्व-द्वंद्व आपणास दिसतें. द्वंद्वाखेरीज जीवनाला अस्तित्व नाहीं. द्वंद्व आहे

म्हणून जग आहे. रोग आहेत म्हणून डॉक्टर आहेत, भांडणें आहेत म्हणून वकील आहेत, चोर आहेत म्हणून पोलीस आहेत, भूक आहे म्हणून शेतें पिकतात, जागे असतो म्हणून झोपायला पहातो, वाचक आहेत म्हणून लेखक आहेत, श्रोते आहेत म्हणून वक्ते आहेत, मूर्ख आहेत म्हणून शहाणे आहेत, माती आहे म्हणून सोनें आहे. जगांतील सर्व माती नाहिशी झाली तर सोन्यानें कोणाच्या पोटीं रहावें ? जिकडे पहावें तिकडे द्वंद–द्वंदयुद्ध म्हणजेच जीवन. द्वंद्व गेलें कीं जग गेलें. द्वंद्वांत दोन असतात. दोघांमुळें जगाचें कार्य चालू रहातें. भाषेंत opposite शब्द असतात. विश्वांतही opposite च्या जोड्या आहेत. हें सर्व जग ठायीं ठायीं opposite नीं भरलेलें आहे. द्वंद्वांत एकाचा अभाव म्हणजे दुसऱ्याचें अस्तित्व. सुखाचा अभाव म्हणजे दुःख व दुःखाचा अभाव झाला कीं सुख भासूं लागते. दोन्ही मिळून जें होते ( अव्यक्त ) तें कांहीं आपणास दिसत नाहीं. त्यांतील एक आपणांस दिसतें. दुसरें माया लपवून टाकते. एकाच नाण्याच्या दोन बाजू एकाचवेळीं आपणांस कधीं दिसत नाहींत. सबंध वस्तू एकाच वेळीं पहाण्याची आपली दृष्टी लोपली आहे. माया द्वंद्व दाखवते ते सुद्धां द्वंद्वातील एकाच वेळीं फक्त एकच दाखवते. या द्वंद्व समाजाच्या जोरावर ती आपणांस झुलवीत असते. द्वंद्वाच्या दुहेरी तारेवर मायेचा खेळ चालू असतो. एकदां या तारेवर तर एकदा त्या तारेवर ती आपणांस नाचावयास लावते. द्वंद्वात विरोध आहे. सबंध द्वंद्व आपल्या हातीं कधींच लागत नाहीं. त्यांतील एकःआपण घेऊं शकतो. मायेच्या साह्यानें कर्मानें तें पुढें केलें तें आपणास नको असते तर ते नाहींसे करण्याचा आपण प्रयत्न करतो. यासाठीं त्याच्या जोडीदाराशीं आपण मैत्री करतो. दुःख नको म्हणून सुखाच्या शोधांत आपण फिरतो व हरप्रयत्नानें ते प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करतो. परंतु सुखाबरोबर थोडेंफार दुःख आपणास पत्करावें लागते. प्रेमाबरोबर मत्सर आलाच. प्रेम करूं लागलांत कीं कुठेंतरी मत्सर उगवत राहतो. कीर्ति मिळवूं लागलांत कीं हेवा डोके वर काढूं लागतो. संपत्तीच्या तिजोरींत हेवेदावे, मत्सर, भय आदि धोके असलेली 'पँडोराची बॉक्स' संपत्ती बरोबर शिरून बसलेली असते. विरोधांत नुकसान आहे, पण फायदाही आहे. क्रांति आहे म्हणून प्रगति आहे. विरोध आहे म्हणून सुधारणा होतात. नुकसान केवळ विध्वंसक नसून विधायकही आहे. घरें पडतात व गांवें उध्वस्त होतात म्हणून नवीन घरें व गांवें अस्तित्वांत येतात. मरण आहे म्हणून जीवनाला महत्व आहे. विरोधांतून प्रगती होते. हिंदु धर्माला व प्रजेला मुसलमानी सत्तेचा विरोध झाला म्हणून शिवरायाचा पराक्रम चमकूं लागला व लोकांत वीरश्री निर्माण झाली. लोकशाही सरकारात विरोधी पक्ष नेभळट असला कीं सत्तारूढ पक्षाचा कारभार झोपेंत चालतो. तोच विरोधी पक्ष प्रबळ असला कीं सत्तारूढ पक्ष डोळ्यांत

तेल घालून कारभार करतो. अशा प्रकारे द्वंद्व व विरोध यांच्या आडव्या उभा धाग्यांनी विणलेल्या या सृष्टीच्या सुंदर तलम रेशमी वस्त्रांत मायेनें आपणांस गुंडाळलें आहे. त्यांतच गुंग होऊन आपण स्वतांस विसरून त्या वस्त्राशीं खेळत राहतों.

मायेचें कार्य दुहेरी चालतें. जें खरें तें लपविणें व जें नाहीं तें आहे असें भासविणें. एकादा भिकारी स्वप्नांत आपण राजा आहे असें पहातो, तसें समजतों व तें ऐश्वर्य भोगतों. या ठिकाणीं प्रथम भिकारीपण मायेनें लपविलें, पडद्याआड केलें व मग जें नाहीं तें राजेपण त्याला भासविलें. नाटकांतील नट रंग-रंगोटी, पोषाख वगैरेचा उपयोग करून आपलें मूळ रूप लपवतात व त्याऐवजीं मुळांत नाहीं असें रूप भासवतात. त्याप्रमाणें बोलतात चालतात वागतात. प्रेक्षकही क्षणैक हें सर्व खरें समजून त्यांत तन्मय होऊन जातात. नटवर्ग जाणूनबुजून मूळ रूपाची जाणीव विसरतात व खोट्यांत रमतात. हा विसर जितका जास्त, खोट्याशीं जितकी तन्मयता जास्त तितकें नाटक अधिक सरस रंगतें. जाणीव झाली कीं नाटक संपलेंच. असाच प्रकार या सृष्टींतील प्राणिमात्रांचा आहे. जें दिसतें व ज्याच्याशीं आपण व्यवहार करतों व आपण स्वतः ही खरीं रूपें नसून मूळ लपवून मायेनें भासमान केलेलीं खोटीं रूपें आहेत. नाटकांतील नटाला आपल्या मूळ रूपाची जाणीव असते म्हणून नाटक संपल्यावर तो चटकन आपल्या मूळ पदावर येतो. आपणास मात्र आपल्या मूळ स्वरूपाची जाणीव नसते. ती झाली कीं मायेचें नाटक संपलेंच. संतांना ही जाणीव असते म्हणून माया त्यांना खेळवूं शकत नाहीं. परंतु नाटकांतील खोट्याला घटकाभर खरें समजून मनरंजनासाठीं जसे आपण रंगून जातो तसे लोककल्याणासाठीं या मायेच्या पसाऱ्याला घटकाभर खरें समजून संत जगांत वावरत असतात. नाटक पहातांना हें सर्व खोटें आहे अशी पदोपदीं आपणांस सुसुप्त जाणीव होत असते. तद्वत् जगव्यवहार करतांना संतांनाही ही सर्व माया आहे याची पूर्ण जाणीव असते. माया इतकी बहाद्दर आहे कीं, संतांनाही भुलवूं पहाते. कच्चीं मडकीं बळी पडतात व पक्कीं मायेच्या माथ्यावर नाचतात. जे नाचतात तेच खरे संत, खरे महात्मे, खरे सिद्ध व खरे दैवी अवतार.

मायेनें निर्माण केलेल्या अहंकाराच्या साह्यानें ती आपले सर्व खेळ करीत असते. अहंकार हें मायेचे शस्त्र आहे. शत्रूला जिंकावयाचें म्हणजे प्रथम त्याचीं शस्त्रें निकामीं करून त्याला निःशस्त्र करावयाचें असतें. मायेच्या नाटकांत आपल्याला भुलविणारे अनेक नट असले तरी या सर्वांचा अहंकार हा दिग्दर्शक आहे. यामुळें हा सर्व खेळ आपल्याला जिंकावयाचा असेल, मुक्ति मोक्ष मिळवावयाचा असेल तर हें कार्य एक एका नटाशीं वशिला लावल्यानें होणार नाहीं तर अहंकाराशीं वशिला लावल्यानें चुटकीसरसे होईल. म्हणून अहंकार जिंका असें अध्यात्मशास्त्र सांगतें. अहंकार गेला कीं मायेची मोहिनी मात्रा आपल्यावर चालणार नाहीं. पण हें सर्व विचार

जितक्या सरळपणें आपणास सुचतात तितक्या सरळपणें अहंकार सहजासहजी जिंकतां येत नाहीं. अहंकार फार बुळबुळीत आहे व सदैव दिग्दर्शकाप्रमाणें पडद्याआड राहून काम करणारा आहे, त्यामुळें त्याला भेटणें व आपल्या मुठींत घेणें महाकठीण आहे. बेसावध राहिलों तर त्याच्या बुळबुळीतपणामुळें आपलाच पाय घसरून आपणच आपटी खायचें. छुपा दिग्दर्शक आहे तो. एखाद्या कार्याच्या मागें तो आहे याचा वासही आपणास यावयाचा नाहीं. आपल्या घरांत आला, आपल्याबरोबर बोलला, चालला, गप्पा मारल्या, खेळला तर आपल्याला त्याचा पत्ताही लागायचा नाहीं. उलट एक जिवलग मित्र व हितकर्ता भेटण्याचा आपल्याला आनंद होईल. जगांतील हेरांतले हेर व सोंगाड्यांतील सोंगाडेही त्याच्या पुढें फिके पडतील. असा हा अहंकार मुठींत ठेवणें कांहीं सोपें काम नाहीं. बरं, यदाकदाचित तुम्हाला तो मिळाला तर मारताही येणार नाहीं व जीवंतही ठेवतां येणार नाहीं. असें कोडें आहे हें. मारणें म्हणजे आपल्या पायावर धोंडा पाडून घेणें व जिवंत ठेवणें म्हणजे आपल्या उरावर बसवणें आहे. याला मारावयाचाही नाहीं व जीवंतही ठेवावयाचा नाहीं, अशी कसरत आपल्याला करायला पाहिजे. कारण अहंकार तसा गुणी व असा अवगुणी आहे. त्यांतील तसा ठेवून असा मारला पाहिजे. अहंकारांत कार्य करण्याची कमालीची ताकद आहे. विधायक व विध्वंसक अशी दोन्हीं कार्यें तो सारख्याच हिरीरीनें करतो. त्याला नाहींसा केला तर जगांतील व आपलेही विधायक कार्य थंडावेल. ठेवला तर तो विध्वंसक गुण उधळींत राहील व दुधांत मीठ टाकायचा आपला उद्योग चालू ठेवील. यास्तव त्याची विध्वंसक धार बोथट करून टाकली पाहिजे व विधायक शक्ति कायम ठेवली पाहिजे. असें करतां आलें तर मायेच्या वतीनें कार्य करणारा हा मायेचा हस्तक आपण जिंकला असें होऊन मायेची मात्रा आपल्यावर चालणार तर नाहींच उलट तिच्याच आधारें आपण जगांत चांगलें कार्य करूं शकूं. संतांनी मायेच्या राज्यांतील हा गृहमंत्री त्याचे विषारी दांत पाडून वश करून घेतलेला असतो. अशा या अहंकाराला कह्यांत कसें आणावयाचें, दांत पाडलेला साप गारुडी आपल्या कार्यासाठीं खेळवतो तसा याला खेळवावयाचा कसा, मायेच्या मोहजाला-पासून दूर कसें रहायचें, तिच्या मायावी मंत्राचा आपल्यावर असर पडणार नाहीं हें कसें घडवून आणावयाचें हे प्रश्न कठीण आहेत व उत्तरापेक्षाहि त्याप्रमाणें प्रत्यक्ष करणें हें तर अधिक कठीण आहे. जोंपर्यंत आपण या जगांत आहोंत तोंपर्यंत मायेंत आपणांस वावरलें पाहिजे. पण तिच्यापासून अलिप्त राहिलें पाहिजे. पाण्यांत राहून कोरडे राहण्यासारखेच आहे हें. ही कसरत साधावी कशी ? याचें मार्गदर्शन बाबांनीं सांगितलेल्या रोहिल्याच्या हकगतींत आहे.

ही हकीकत अशी आहे. एक रोहिला बाबांच्यापाशीं येऊन राहिला होता.

रोज तो रात्रभर कुराणांतील कलमे जोरजोरानें व अति उच्चस्वरानें म्हणत असे. त्याचा आवाज इतका मोठा होता कीं, गांवकऱ्यांना त्याच्या पठणाचा त्रास होऊं लागला. दिवसभर काम करून थकल्याभागलेल्यांना रात्रीं धड सुखाची झोंप मिळेना. याबद्दल बाबांच्याकडे ग्रामस्थांनीं तक्रार केली असतां बाबांनी सांगितलें कीं, असूंद्या, त्याला कलमे म्हणूंद्या. त्यायोगें मला सुख होतें. त्याचें कलमे म्हणणें थांबलें कीं त्याची बाईल माझ्या घरांत घुसूं पहाते व मला छळते. हा कलमे म्हणत असला म्हणजे तेवढाच मला निवांतपणा. ही हकीकत छोटिशीच आहे. त्यांत रोहिला, त्याची बाईल, कलमे, मला गांजते हे शब्द महत्वाचे आहेत. कारण त्या शब्दद्वारा बाबाना जें सांगायचे आहे तें त्यांनीं व्यक्त केलें आहे. यांतील रोहिला म्हणजे अहंकार. बाईल म्हणजे त्याची साथीदारीण माया. कलमे म्हणजे भजन—नामस्मरण. कलमे पढण्याच्या नादी अहंकार लागला कीं माया आपल्याला त्रास देत नाहीं. पण थांबला कीं माया आपल्या घरांत घुसूं पाहते. माया व अहंकार यांचा बराच विचार आपण आतांपर्यंत केला आहे व मायेच्या तडाख्यांतून सुटण्यासाठीं अहंकाराला जिंकले पाहिजे येथपर्यंत आपण आलों आहोंत. फक्त त्याला जिंकायचें कसें व मायेपासून अलिप्त राहायचें कसें याचा विचार करावयाचा आहे कसेंचें उत्तर उच्च स्वरानें कलमे पढल्यानें म्हणजेच नामस्मरणानें व भजनानें. या योगें अहंकाराचे विषारी दांत पडून जाऊन तो आपणास वश होतो व मग त्याच्या करवी चांगलें कार्य आपण संपादूं शकतो. व मायेच्या पाशांतून मुक्त होतों. असें बाबांनीं वरील हकिकतींत सूचीत केलें आहे. हें कसें घडून येतें तें आतां आपण पाहूं. या योगें नामस्मरणाला व भजनाला तसेंच कीर्तनाला अध्यात्मांत किती महत्त्व आहे हें कळून येईल.

मोक्ष मुक्ति मिळविण्याचें वा आपलें सर्व प्रकारें कल्याण साधून सुखी व आनंदी होण्याचे जे कांहीं मार्ग अध्यात्मांत सांगितलें आहेत त्या सर्वांत सुकर मार्ग भक्तिमार्ग होय. भक्तिमार्गांतील नामस्मरण व भजन ही सुलभ साधनें आहेत. बहुतेक साधुसंतांनीं या साधनांवर विशेष भर दिला आहे. कारण सर्वसाधारण माणसाला विशेषतः संसारी माणसाला आपले सर्व व्यवहार सांभाळून ती वापरता येतात. शिवाय ही साधनें प्रभावीही आहेत. ज्याचे आपण सतत नामस्मरण व भजन करतों त्या दैवताचे गुण केवळ सतत ध्यानामुळें आपल्या ठायीं उत्पन्न होतात. सतत चिंतन ही एक जबरदस्त शक्ति आहे. सोवळ्या मनाला चमत्कारीक वाटलें तरी चिंतनाची जबरदस्त शक्ति ध्यानीं येण्यासाठीं नित्य व्यवहारांतील कथाकादंबऱ्यांतून आढळणारे एक उदाहरण देणें प्राप्त आहे. तीचें तीवर इतकें गाढ प्रेम असतें कीं, तीचें मन तिने भरून गेलेलें असतें. तिच्या खेरीज दुसरें कोणतेहि विचार व भावना त्याला शिवत नाहींत. इतर विचार व भावना यांचा त्याला पूर्ण विसर पडतो व [illegible]

करण्यास त्याच्या ठिकाणी हत्तीचें बळ येतें. ही गोष्ट सर्पाला दोर समजून तुलसीदास माडी चढून गेला यावरून स्पष्टच होत आहे. तोप्रमाणेंच भक्ताची स्थिती आपल्या दैवताबद्दल होते. अध्यात्मांत सद्‌गुण व सदाचार यांना फार महत्त्व आहे. सद्‌गुण हा ईश्वर प्राप्तीचा पाया आहे. नामस्मरण व भजन याने आपल्या दैवताकडे जसजसा आपला लय लागत जातो तसतसें आपणाला आपले विषय विकार वासना यांचा विसर पडत जातो. ही गोष्ट सतत नियमानें व निष्ठेनें होत राहील तर ईश्वरावरील आपल्या शुद्ध प्रेमाचें वर्तुळ अधिकाधिक विस्तारत राहते. जसजसा हा विस्तार होईल तसतसे विकार व वासनांच्या विस्मृतीचे वर्तुळ वाढत जाते व स्मृतीचें कमी कमी होत जाते. या योगें आपलें चित्त शुद्ध होते व अहंकाराची विध्वंसक धार बोथट होते. कोणत्याहि गोष्टीपासून आलिप्त राहाण्याचा उत्कृष्ट मार्ग म्हणजे त्या गोष्टीचा विसर पडणें हा होय. सतत नामस्मरण व भजन यामुळें असा विसर हळू हळू पडत जातो व आपल्या मनाची विषयवासना यांकडील ओढ हळूं हळूं कमी कमी होत जाते. सततपणाचें रूपांतर संवयींत होतें व जीवन संवयीनें बनलेलें असतें. सतत नामस्मरण भजन यामुळें भक्ताला ईश्वरी प्रेमाची संवय लागून जाते व त्याचें सर्व जीवन ईश्वरी प्रेममय होतें, ईश्वरावर प्रेम करणें, हा त्याचा स्वभावच होऊन जातो. पुढें हें ईश्वरी प्रेमाचें वर्तुळ वाढत वाढत शेवटीं विश्वप्रेमाच्या वर्तुळांत विलीन होतें व विश्वची माझें घर असा त्याचा स्वभावधर्म होऊन बसतो व त्याच्यापुरता सत्वरजतम यांचा समन्वय साधला गेल्यामुळें मायेच्या मोहांतून तो मुक्त होतो. मायेच्या मोहिनीतून विकार व वासना यांच्या पकडींतून सुटण्यास विसर हें प्रभावी औषध असल्यामुळें व भजनामुळें हें औषध अधिक तीव्रतर होत असल्यामुळें बाबांनीं लोकांना सांगितलें—

याची ही ओरड एणेपरी । आहे मज बहु हितकारी ॥
ऐसा हा रोहिला परोपकारी । बहु सुखकारी मजलागीं ॥ ३–१२४ ॥
ओरडूं द्या त्यासी येथेष्ठ । त्यांतची आहे माझें इष्ट ॥
नातरी ती रोहिली दुष्ट । देईल कष्ट मजलागीं ॥ ३–१२५ ॥



# स्वामी विवेकानंद–शिष्या

# भगिनी निवेदिता

## [ जन्म–शताब्धीच्या निमित्तानें ]

## २

लेखक : **पु. बा. कुलकर्णी**

भारताच्या दृष्टीनें तो राजकीय धामधुमीचा काळ होता. फाळणीमुळें सारा बंगालच नव्हे तर सारा भारत पेटलेला होता. सुरेंद्रनाथ बानर्जी, अरविंद घोष, बिपीनचंद्र पाल ह्यांचा तो जमाना होता.

भगिनी निवेदिता केवळ शिक्षण प्रसार करण्यांत व्यग्र होऊन रहाणें शक्य नव्हतें. भारताचें सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक त्याचप्रमाणें औद्योगिक पुनरुत्थान व्हायचें असेल तर तें परकीय राजसत्तेखालीं होणें मुळींच शक्य नाहीं, अशी त्यांची अनुभवांती खात्री होऊन चुकलेली होती. युरोपमधील निरनिराळे देश स्वातंत्र्य उपभोगीत असल्यामुळें त्या त्या राष्ट्रांतील लोकांनीं आपापली सर्वांगीण उन्नति कशी झपाट्यानें करून घेतली आहे व भारतांतील लोक वर्षानुवर्षें गुलामगिरींत खितपत पडल्यामुळें सर्व क्षेत्रांत त्यांच्या वांट्यास कशी अवनती आलेली आहे हें त्या प्रत्यक्ष पहात होत्या.

तुम्हीं वाटेल तें करा. उंच उडी मारण्याचा प्रयत्न करा. तुम्हीं कुठें ना कुठें अडखळून जमिनीवर आदळणार. तुम्हांला पारतंत्र्यामुळें बंधनांत वावरावें लागणार. सत्य बोलण्याची चोरी. प्रगति झालीच तर ती ठराविक मर्यादेपर्यंतच ! तुमच्या देशांत तुम्हीं उठतां बसतां अपमानाचें जीवन कंठायचें !

भारताचा उज्ज्वल भूतकाळ भगिनी निवेदिता ह्यांच्या दिव्य दृष्टीपुढें नाचत होता. वर्तमान काळातील ह्या देशाची दैना त्या पहात होत्या. मुलींच्या शाळेंत बसून त्यांच्यानें रहावेना. तो भार आपल्या निष्ठावान् सहकारिणीवर सोपवून देशांत जागृति घडवून आणण्यासाठीं त्या व्याख्यानांच्या दौऱ्यावर निघाल्या.

भारत पूर्वकाळी वैभवसंपन्न होता आणि आतां पुन्हां त्याला वैभवाच्या शिखरावर बसविण्यासाठीं झटणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. त्यासाठीं आळस सोडून प्रत्येकानें यथाशक्ति उद्योगास लागलें पाहिजे. आतां झोपून चालणार नाहीं हेंच त्यांना सर्व जनतेला कळकळीनें सांगायचें होतें.

त्याशिवाय जनतेच्या मनावर तीन गोष्टी त्यांना प्रामुख्यानें बिंबवावयाच्या होत्या. ही वेळ आणीबाणीची आहे. ती आपण साधली पाहिजे व भारत स्वतंत्र्य

करून त्याला वैभवशिखरावर पुनरपि नेऊन आपण बसविला पाहिजे. तुम्ही स्वतःला मुळींच दुबळे समजूं नका. तुम्हीं शेळया मेंढरें बनूं नका. व्याघ्र आणि सिंह बना. तुम्हीं आहांतच तसे; परंतु तुम्हीं स्वतःला विसरून गेलां आहांत. तुमच्या डोळ्यांवर व साऱ्या देहांवर काळोख व निराशा पसरली आहे. ती फडफडून झाडून मोकळे व्हा. परकीय सत्तेनें तुम्हांला सर्व बाबतींत दुर्बल व परावलंबी बनवून ठेविलें आहे. ती दुर्बलता झाडूनसवरून तुम्हीं मोकळे झालें पाहिजे. आणि पारतंत्र्याचे मानेवरील जूं झुगारून दिल्याशिवाय दुबळेपणा नाहींसा होणार नाहीं. त्याचप्रमाणें श्री रामकृष्ण व स्वामी विवेकानंद यांचा अवतार तुम्हांला काळोखांतून प्रकाशाकडे घेऊन जाण्यासाठीं झाला. तेव्हां त्यांचें तत्वज्ञान प्रत्येकानें समजून घेऊन तें रोजच्या आचरणांत आणलें पाहिजे.

त्या म्हणत असत कीं, ह्या दोघांना सतत दृष्टीसमोर ठेवून व त्यांच्या शिकवणुकीचें मनन करून आपण आपला उद्धार करून घेतला पाहिजे.

स्वामी विवेकानंदांचा संदेश घरोघर पोहोंचविण्यासाठीं भगिनी निवेदिता ह्या देशाच्या मुंबई, नागपूर, बडोदा, वर्धा, अहमदाबाद त्याचप्रमाणें मध्यप्रदेश, बिहार वगैरे प्रांतांतून हिंडल्या. अखिल भारताचा दौरा करून त्या कलकत्त्यांत १९०२ सालीं परतल्या. १९०४ सालीं त्यानीं बिहार व संयुक्त प्रांतांचा जो दौरा केला तो शैक्षणिक दृष्ट्या महत्वाचा होता.

पाटणा, राजगृह, नालंदा, बनारस, लखनौ वगैरे सर्व शहरांस भेटी देऊन प्रत्येक भागांत जागृति घडवून आणून त्या परत कलकत्त्यास आल्या.

कलकत्ता हें त्यांचें घर होतें. तेथें येतांच शाळेच्या कार्याकडे व लेखनाकडे त्या आपला बहुतेक वेळ लावीत असत.

१९०५ साल उजाडलें आणि बंगालच्या फाळणीमुळें साऱ्या देशभर खळबळ व जागृती निर्माण झाली.

फाळणीचें व तिच्यापायीं अनन्य साधारण जागृती घडवून आणण्याचे श्रेय लॉर्ड कर्झनकडे जातें. भारतावर त्यानें फार मोठे उपकार करून ठेविले आहेत.

भारतीय जागृतीचा तो उषःकाळ होता. भारताचा नव–जन्म होत होता. त्याच्या त्या मधुरमधुर वेदना होत्या. भारतीय जीवनांतील तो सुरम्य नि महत्त्वाचा काळ भगिनी निवेदिता यांनीं स्वतःच्या डोळ्यांनी पाहिला व अनुभविलाही.

उघडरीतीनें तत्कालीन राष्ट्रीय चळवळींत त्यांना पडतां येत नव्हतें; परंतु अन्य रीतीनें त्या राष्ट्रीय चळवळीशीं एकजीव झाल्या होत्या. जें घडावें असें मनापासून वाटत होतें तें ईशकृपेनें घडून येत होतें. ती भगवत कृपा होती. त्याकाळीं रमेशचंद्र दत्त, गो. कृ. गोखले, बिपीनचंद्र पॉल, अरविंद घोष, रविंद्रनाथ व अवनिंद्रनाथ टागोर,

रामानंद चतर्जी नि जदुनाथ सरकार ह्या सर्व थोरामोठ्यांशीं व बुद्धिवंतांशी त्यांचा अत्यंत निकट संबंध होता, त्या सर्वांचा विश्वास त्यांनीं संपादन केला होता.

भगिनी निवेदिता ह्यांच्या आयुष्यांतील अत्यानंदाचा व समाधानाचा तो काळ होता. तत्कालीन सरकारचें लक्ष त्यांच्या हालचालींकडे बारकाईनें लागून राहिलेलें होतें; परंतु त्या अत्यंत सावधगिरीनें वागत असल्यामुळें उघडरीतीनें सरकार त्यांच्या वाट्यास जाऊं शकलें नाहीं.

ह्या काळांत देश-जागृतीसाठीं भगिनीनें अविश्रांत मेहनत घेतली. उत्साहभरांत त्यांनीं स्वतःच्या प्रकृतीची पर्वा कधींही केली नाहीं. आणि त्याचा परिणाम जो व्हायचा तो झाला! १९०५ अखेर त्यांना अशक्तपणा जाणवूं लागला. १९०६ सालीं देशाच्या कांहीं भागांत महापुरामुळें व दुष्काळामुळें हाहाकार उडाला. त्यांच्यानें एका जागीं बसून रहावेना, त्यांनीं पीडित भागांस भेट दिली. जनतेची दैनावस्था पाहिली, त्याच-बरोबर त्या भागांसाठीं निधी जमा करून व करवून तो जरूर त्यांना वाटण्याची व्यवस्था केली.

भगिनी निवेदिता पूर्व-बंगालमध्यें महापुरामुळें असहाय्य झालेल्या लोकांची स्थिति प्रत्यक्ष पहाण्यासाठीं गेल्या तेव्हां तेथें मलेरियाची व त्यांची भेटगांठ झाली. ती मगरमिठी पुढें कधींच ढिली होऊं शकली नाहीं.

त्यानंतर हवापालट करण्यासाठीं त्या परदेशीं गेल्या. जरा बरें वाटूं लागतांच त्या परत भारतांत आल्या व कामांत गर्क झाल्या. आजार आतां त्यांचा कायमचा मित्रच झाला होता. डॉक्टरी सल्ल्यावरून पुनरपि त्या स्वदेशीं गेल्या. परंतु तिकडे गेल्या तरी त्यांचें अंतःकरण इकडे गुंतलेले होतें. तिकडे त्यांना मुळींच चैन पडत नसे.

१९११ च्या वसंत ऋतूंत त्या परत कलकत्त्यांत येऊन कामास लागल्या. वार्षिक पूजेनिमित्त रजा पडली तेव्हां आराम वाटावा व कामकाजाचा विसर पडावा म्हणून भगिनी दार्जिलिंगला गेल्या. त्या तेथून परत आल्या नाहींत. तेथेंच त्यांनीं कायमची विश्रांति घेतली!

किती अल्प वयांत त्यांनीं या जगाचा निरोप घेतला! उणींपुरीं चवेचाळीस वर्षें झालीं होतीं त्यांना! त्यांच्या निधनामुळें सारा देश हळहळला!

डॉ. रासबिहारी घोष, सुरेंद्रनाथ बानर्जी, पं. मदन मोहन मालवीय, ना. गोखले हे सारे सारे हळहळले! सर्वांनीं ह्या असामान्य गोऱ्यामहिलेबद्दल फार मोठ्या आशा बांधल्या होत्या, त्या साऱ्या धुळीस मिळाल्या!

५०|५५ वर्षें होऊन गेलीं त्या दुःखद घटनेला! पुढील वर्षी त्यांची जन्म-शताब्दि येत आहे. त्या निमित्त हें पुण्यस्मरण!

ना. गोपाळ कृष्ण गोखले त्यांच्याबद्दल काय म्हणतात पहा:— " भगिनी निवेदिता ह्यांना मी फार चांगला ओळखत होतों. सतत दहा वर्षें त्यांचा व माझा निकट संबंध होता. त्यांची तुलना कोणाशीं व कशी करावी हेच समजत नाहीं. त्यांचा उत्साह फार दांडगा होता. त्यांच्या सान्निध्यांत येणें म्हणजे जादूनें भारलें जाण्यासारखें होतें. त्यांचें व्यक्तिमत्व व भारत-भक्ति फार दांडगी होती. त्यांच्यासारख्या त्याच. त्यांनीं भारत बरोबर ओळखला होता. त्यांची बुद्धिमत्ता, ग्रहणशक्ति व विचारांची खोली फार दांगडी होती. जें जें भारतीय त्यावर त्यांची असीम श्रद्धा होती. अनेक बहुमोल गुणांमुळें त्यांनीं कोणताही देश वैभवाप्रद आणिला असता. भारत त्यांच्या सेवेला मुकला हें आपलें दुर्दैव होय. भारतावर त्यांनीं अलोट व असामान्य प्रेम केलें. भारतसेवेला त्यांनीं स्वतःला सर्व परीनें अर्पण केलें. अशा प्रकारचें आत्मसमर्पण क्वचित्‌च पहायला मिळतें. त्यांच्यासारखी आत्मसमर्पण केलेली निस्सीम सेविका कोणत्याही देशांत सांपडणें कठीण आहे."




# लहान मुलांच्या आंकडीवर

## जुनें आणि प्रसिद्ध औषध

जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# कर्मांतील आनंद

योगेश्वर श्री अरविंद

## ( उत्तरार्ध )

आमच्या कर्मांचा अधिपति, आमच्या कर्मांना गती देणारा एकमेव ईश्वर आहे. तो विश्वश्रेष्ठ ( विश्वातीत ) शाश्वत आणि अनंत असा ईश्वर आहे. तो अज्ञात किंवा अज्ञेय विश्वातीत केवलरूप आहे; तो आमच्या वरती आहे, तो अव्यक्त अनाविष्कृत अनिर्वचनीय असा आहे; तो असा असून सर्व जिवांचा आत्मा तोच आहे; सर्व विश्वांचा प्रभु तोच आहे; सर्व विश्वापलीकडे तोच आहे; तो सर्वांचा प्रकाश आहे, सर्वांचा मार्गदर्शक आहे; तो सर्व सुंदर आहे, सर्वानंद आहे; तो प्रियतम आहे, प्रियकर आहे. तो विश्वचैतन्य आहे, आमच्या सभोंवारची निसर्गशक्ति तोच आहे; आमच्या ठिकाणचा अंतर्यामी तोच आहे. जें आहे तें तें सर्व तो आहे; आणि आहे त्याहून अधिक जें, तेंहि तो आहे; आणि आम्ही स्वतः (आम्हांला या गोष्टीचें ज्ञान नसलें तरी) त्याच्या अस्तित्वांतील अस्तित्व, त्याच्या शक्तींतील शक्ति आहों; त्याच्या जाणिवेंतून आलेल्या जाणिवेनेंच आम्ही जाणीवयुक्त आहों; त्याच्याच घटक-द्रव्यांतून आमचें मर्त्य अस्तित्व देखील बनलेलें आहे. आम्हां-मध्यें जें एक अमर तत्त्व आहे व त्याच्या शाश्वत प्रकाशाचा तें शाश्वत आनंदाचा एक किरण, एक स्फुलिंग आहे; ज्ञानानें, कर्मानें, भक्तीनें ( प्रेमानें ) किंवा इतर साधनांनीं आमच्या अस्तित्वाचें हें सत्य जाणून घेणें, हें सत्य साक्षात करणें, हें सत्य येथें किंवा इतरत्र कार्यवाहींत आणणें हेंच सर्व योगांचें साध्य आहे.

★

"मी कर्ता नाहीं, विश्वशक्ति कार्य करणारी आहे, मी तिचें एक साधन आहे" ही वृत्ति साधकानें पक्की करणें ही पहिली व महत्त्वाची पायरी आहे. प्रथम, एकच विश्वशक्ति आम्हांला कामाला लावते असें दिसत नसून, आम्हांला कामाला लावणाऱ्या अनेक विश्वगत शक्ती आहेत असें दिसतें.

या अनेक शक्ती अहंभावाला पोषक होऊं शकतात. या नव्या दर्शनानें मन 'मुक्त' होऊं शकतें, परंतु प्रकृतीचीं दुसरीं अंगें मुक्त होत नाहींत. एकच विश्व-शक्ति काम करीत आहे आणि तिच्या पाठीमागें विश्वेश्वर आहे हें आम्हांला

पटल्यानतर देखील आम्ही 'मुक्त' होऊंच असें नाहीं. वर्तृत्वाचा अहंकार जाईल पण त्याची जागा साधनत्वाचा ( मी साधन आहे हा ) अहंकार घेईल; याचा अर्थ, कर्तृत्वाचा अहंकार वेषांतर करून टिकून राहील, असा करतां येतो. साधनत्वाच्या अहंकाराचीं उदाहरणें जगाच्या जीवनांत भरपूर घडलेलीं आहेत; दुसऱ्या कोणत्याहि अहंभावाहून हा अहंभाव मानवाला अधिक व्यापून टाकणारा आहे आणि अधिक अत्याचार घडविणारा आहे; योगांतहि या अहंकारानें साधक व्यापून जाण्याचा धोका असतो. मनुष्य नेता बनतो, लहान किंवा मोठ्या वर्तुळांत महत्त्वाचा श्रेष्ठी बनतो, आपल्या अहंभावापलीकडून कोणी शक्ति प्रेरणा देत आहे, या प्रेरक शक्तीने आपण भरलेले आहों अशी त्याला भावना होते; नियति माझ्याद्वारां काम करीत आहे, गूढ रहस्यमय इच्छाशक्ति माझ्याद्वारां काम करीत आहे, माझ्या अंतरंगांत महातेजस्वी प्रकाश आहे व तो माझ्याद्वारां काम करीत आहे अशी त्याची भावना होते. त्याच्या विचारांचे, त्याच्या कृतींचे, त्याच्या निर्माणशील प्रतिभेचे परिणाम असामान्य असे होत असतात. तो महान् विध्वंसाचें काम करतो आणि मानवतेला रस्ता मोकळा करून देतो; किंवा तो महान् रचनात्मक कार्य करतो आणि भावनेला क्षणिक आरामाची जागा करून देतो. तो कालपुरुषाच्या आसुडाचें काम करतो, किंवा तो प्रकाश व स्वास्थ्य आणतो, सौंदर्य निर्माण करतो, ज्ञानाचा दूत होतो. किंवा जर त्याचें काम आणि त्या कामाचे परिणाम मर्यादित क्षेत्रांतले व मर्यादित असतील तर मी साधन आहे, माझ्याकडे नियतीनें हें काम सोंपविलें आहे, माझी धडपड तिला पसंत आहे म्हणून मला या कामासाठीं पसंत केलें आहे ही अहंकाराची भावना खूप जोरदार असूं शकते. ज्या माणसांना या शक्ती असतात आणि ही नियति आहे असें भासतें त्यांना असें सहजच वाटतें व ते घोषणा करतात कीं, ईश्वराच्या आणि नियतीच्या हातांतील एक यंत्र, एक साधन आम्ही आहोंत; सामान्य माणसांना अंतःकरणांत बाळगणें किंवा प्रकटपणें घोषित करणें शक्य नाहीं एवढा मोठा अतिरेकी तीव्र अहंकार या घोषणेंत दडलेला असूं शकतो. या प्रकारची माणसें ईश्वराचें नांव घेतात तेव्हां ते त्याची अशी प्रतिमा उभी करतात कीं, जी त्यांचीच, त्यांच्या प्रकृतीची मोठी छाया असते. त्यांच्या इच्छेचा, विचाराचा, गुणाचा, शक्तीचा नमुना, देवत्व अर्पण केलेला, त्यांना आधार देणारा नमुना असें त्या ईश्वराचें स्वरूप असतें. त्यांच्या अहंकाराची मोठी केलेली ही प्रतिमा हाच प्रभू, त्यांचा ईश्वर असतो, या प्रतिमेची ते सेवा करतात, पूजा करतात.

योगमार्गांत या प्रकारचा अहंकार अनेकवेळां साधकाला भोंवतो—ज्या साधकांची प्राणिक प्रकृति जोरदार पण निकृष्ट दर्जाची आहे, ज्यांचें मन प्राणिक वासनांनीं व्यापलेलें आहे, त्यांनीं आपल्या आध्यात्मिक साधनेंत, त्यांचा विशुद्ध हेतु महत्त्वाकांक्षेनें, गर्वानें, मोठेपणाच्या वासनेनें कलंकित होऊं दिला कीं ते लवकर बेभान


होतात आणि वरील प्रकारच्या अहंकारानें व्याप्त होतात; त्यांचा खरा आत्मा आणि ते, यांच्यामध्यें त्यांचा 'महान् बनलेला मी' उभा राहतो; आणि स्वतःच्या वैयक्तिक योजनेसाठीं महान् अदृश्य किंवा आसुरी शक्तीपासून त्यांना मिळणारें सामर्थ्य वापरतो; या शक्ती त्यांच्याद्वारां काम करीत असतात, आणि या गोष्टीचें स्पष्ट किंवा अंधुक ज्ञान त्यांना असतें. तात्पर्य असें कीं, आमच्याहून थोर अशी शक्ति आहे आणि ती शक्ति आम्हांकडून हालचाल करवीत आहे या वस्तुस्थितीचें बौद्धिक ज्ञान किंवा जाणीव ही आम्हांला अहंकारापासून मुक्त करण्यास पुरी पडत नाहीं.

स्वतांमध्यें किंवा स्वतःच्या वरती महान् शक्ति आहे आणि ती स्वतःला प्रेरणा देत आहे अशी जाणीव होणें, भान होणें हा कांहीं भ्रम नव्हे, किंवा आत्म-गौरवाचें वेड नव्हे. ज्यांना असें भान होतें, ज्यांना असें दिसतें, त्यांना सामान्य जनाहून मोठी दृष्टि आलेली असते, मर्यादित भौतिक बुद्धीच्या पलीकडे त्यांनीं पाऊल टाकलेलें असतें; तथापि त्यांची ही दृष्टि पूर्ण असत नाहीं, त्यांची अनुभूति प्रत्यक्ष अनुभूति असत नाहीं. ते मनाचे स्वच्छ नसल्यानें, आत्मा त्यांच्या ठिकाणीं जागृत नसल्यानें, त्यांची जागृति विशेषतः प्राणिक अंगांत असून आत्म्याच्या आध्यात्मिक अंगांत नसल्यानें, ते ईश्वराची जाणिवयुक्त साधनें होऊं शकत नाहींत; ईश्वराला, त्यांच्या कर्माधिपतीला ते समोरासमोर बघूं शकत नाहींत, त्यांची प्रमादशील अपूर्ण प्रकृति साधन म्हणून उपयोगांत आणली जात असते. त्यांना जें ईश्वराचें दर्शन घडूं शकतें तें, ईश्वराची जी नियति (नमलेली योजना पार पाडणारी शक्ति) असते तिच्या स्वरूपांत घडूं शकतें; किंवा विश्वशक्तीच्या स्वरूपांत घडूं शकतें; ईश्वराच्या एखाद्या मर्यादित शक्तीच्या देवतेला [दैवी शक्तीला] किंवा ईश्वराला झाकून टाकणाऱ्या एखाद्या आसुरी, राक्षसी शक्तीला पण ईश्वर या नावानें हीं माणसें संबोधतात. कांहीं धर्म-संस्थापकांनीं आपल्या पंथापुरता देव उभा केला आहे, राष्ट्रीय देव उभा केला आहे, भयानक दंडशक्ती ही प्रमुख देवता म्हणून उभी केली आहे, किंवा सात्विक प्रेम, करुणा, सत्प्रवृत्ति यांनीं युक्त अशी देवता प्रमुख म्हणून कल्पिली आहे—त्या धर्मसंस्थापकांना एकमेव शाश्वत ईश्वर दिसला नाहीं असें दिसतें. ईश्वराची जी कोणती प्रतिमा हे कल्पितात ती प्रतिमा ईश्वर मान्य करतो आणि त्या प्रतिमेच्या द्वारां त्यांच्यामध्यें काम करतो; तथापि, एकच शक्ति या लोकांच्या अपूर्ण प्रकृतींत इतरांहून अधिक तीव्रतेनें काम करीत असल्यानें व अधिक तीव्रतेनें जाणवत असल्यानें. त्यांचें अहंभावाचें प्रेरक तत्त्व पण इतरांहून अधिक तीव्रता धारण करतें. हे लोक आणि पूर्ण सत्य यांच्यामध्यें उन्नत राजसिक अथवा सात्विक 'मी' उभा असतो आणि तो सत्यापासून त्यांना दूर ठेवतो ही अवस्था पण एक प्रगतीचें पाऊल आहे; अर्थात् खरी पूर्ण अनुभूति या अवस्थेहून खूप दूर असते. मानवी बंधनें न मानणारे, तीं मोडणारे व त्या बरोबर मनाची शुद्धता नसणारे आणि

ज्ञानहि नसणारे असे जे दुसरे कोणी असतात, त्यांना मोठ्या आपत्तींत पडावें लागतें— कारण हे लोक साधनें होतात, पण ईश्वराचीं साधनें होत नाहींत, तर ईश्वराचें नांव वापरून, अजाणतां, ईश्वराच्या, त्याला झांकणाऱ्या मुखवट्यांचीं, विरोधी कृष्णशक्तींचीं, आसुरी राक्षसी शक्तींचीं साधनें होतात.

आमच्या प्रकृतीनें विश्वशक्तीला आपल्या ठिकाणीं घर करून दिलें पाहिजे; परंतु ही विश्वशक्ति आपल्या ठिकाणीं घेतांना, आपल्या निकृष्ट तामसिक अंगांत किंवा राजसिक, सात्विक अंगांत तिला कोंडूं नये; आमच्या प्रकृतीनें विश्वेश्वराची इच्छा अंमलांत आणली पाहिजे, परंतु हें करतांना महान् मुक्तिप्रद ज्ञानाचा उपयोग केला पाहिजे. साधक आपली साधनत्वाची भावना दृढ करतांना कोणत्याहि प्रकारें अहंभावाचा दास होतां कामां नये; त्याच्या आंतील शक्ति महान् शक्ति आहे ही जाणीव त्याला स्पष्टपणें झाली असली, तरी त्यानें अहंभावाच्या आहारीं जातां कामां नये. प्रत्येक मनुष्य जाणतां अजाणतां विश्वशक्तीचें साधन असतो. अंतरंगांत विश्वशक्तीची उपस्थिति असल्याचें एखाद्याला ज्ञान असतें, सर्वांच्या ठिकाणीं हें ज्ञान नसतें; हाच काय तो माणसामाणसांत भेद असतो; कृतीकृतींत कांहींहि सारभूत भेद नसतो, साधनासाधनांत कांहीं सारभूत भेद नसतो; म्हणून साधनत्वाचा अहंकारी अभिमान बाळगणें हा मूर्खपणा आहे; अशा अभिमानाला वस्तुतः कांहींहि जागा असत नाहीं. ज्ञान व अज्ञान यांत अंतर आहे हें खरें आहे; परंतु हें अंतर परमात्म्याच्या कृपेचें निदर्शक असतें; दिव्य ईश्वरी शक्ति आपल्या स्वतःच्या इच्छेनुसार वाऱ्याप्रमाणें वावरत असते; आणि आज एका माणसांत आपला शब्द आणि शक्ति भरते, उद्यां दुसऱ्या माणसांत आपला शब्द आणि शक्ति भरते. कुंभार एक मडकें चांगलें बनवितो, दुसरें तितकें चांगलें बनवीत नाहीं; या ठिकाणीं मडक्याला श्रेय नाहीं तर मडकें करणाराला श्रेय आहे; हीच गोष्ट ज्ञान वा अज्ञान कमी अधिक असलेल्या माणसांच्या संबंधांत समजावी. आमच्या मनाची वृत्ति "ही माझी शक्ति आहे," किंवा "पहा, ईश्वराची शक्ति माझ्यामध्यें किती आहे," या प्रकारची नसावी; आमच्या मनाची वृत्ति पुढीलप्रमाणें असावी :—"या माझ्या मनांत आणि शरीरांत ईश्वरी शक्ती काम करीत आहे; सर्व माणसांत काम करते तीच ईश्वरी शक्ती माझ्यांत काम करीत आहे; सर्व प्राण्यांत, वनस्पतींत, धातूंत काम करते तीच ईश्वरी शक्ती माझ्यांत काम करीत आहे; जाणीवयुक्त आणि प्राणयुक्त वस्तूंत आणि अचेतन प्राणशून्य दिसणाऱ्या वस्तूंत जी ईश्वरी शक्ति काम करते तीच माझ्यांत कार्य करीत आहे." ही दृष्टि, ही वृत्ति व्यापक आहे; एकच ईश्वर सर्वत्र काम करीत आहे; सर्व जग त्याच्या दिव्य कृतीचें आणि त्याच्या क्रमशः आत्माविष्काराचें समान दर्जाचें साधन आहे ही दृष्टि, ही वृत्ति आमच्या अनुभवाला सर्वत्र व्यापून राहिली तर आमचा राजसिक अहंकार आणि आमचा सात्विक अहंकार देखील आमच्यांतून, आमच्या प्रकृतींतून नाहींसा होण्यास या वृत्तीची खूप मदत होइल.

अहंभावाचा हा साधनत्वसंबंधीं अहंकार नाहींसा झाला म्हणजे आमच्याकडून खरें साधन-कर्म, साधनीभुत कर्म घडतें. पूर्ण कर्मयोगाचें सार कर्मांत आहे; कारण साधनत्वाचा अहंकार आम्ही आमच्या ठिकाणीं पोषीत असतों तोंपर्यंत 'आम्ही ईश्वराचें जाणीवयुक्त साधन आहोंत." अशी कितीहि बढाई मारली तरी वस्तुतः ईश्वरी शक्तीला आमच्या स्वतःच्या वासनांचे, आमच्या स्वतःच्या अहंभावप्रधान योजनेचें साधन करीत असतों. अहंभाव नष्ट न करतां आम्ही त्याला केवळ गौण स्थानीं बसवला, गुलामाच्या स्थानीं बसवला, तरी ईश्वरी कार्याचें साधन आम्ही होऊं शकूं यांत संदेह नाहीं; परंतु आमचें साधनत्व सदोष, अपूर्ण असेल तर आमच्या मानसिक प्रमादांनीं, आमच्या प्राणिक विकृतींनीं, आमच्या भौतिक प्रकृतीच्या हट्टी अपात्रतानीं ईश्वरी कार्याला आम्ही भलती दिशा देऊं, तें कार्य बिघडवून टाकूं. हा अहंभाव नष्ट झाला म्हणजेच ईश्वराची, ईश्वरी शक्तीची खरी निर्मल क्रियासाधनें आम्ही होऊं, ईश्वराचा हात जिकडे आम्हांला वळवील तिकडे आम्ही जाणीव पुरःसर वळत जाऊं; आमची खरी प्रकृति ( खरें स्वरूप ) आम्हांला कळेल—एका शाश्वत अनंत ईश्वराचे आम्ही जाणीयुक्त अंश आहोंत हें आम्हांला कळेल; ईश्वरी शक्तीनें आपल्या कार्याकरितां आम्हांला स्वतःच्या ठिकाणीं पुढें केले आहे, हें आम्हांला कळेल.




॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

# महिला वस्तु भांडार

**भरतकाम, विणकाम, शिवणकाम**

यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें

लोंकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधानांचे व्यापारी.

छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)

* आमची कोठेंही शाखा नाहीं. *

# ज्ञानदेव आणि चांगदेव

## गर्व-परिहार

राजयोग, कर्मयोग, ज्ञानयोग इत्यादि जीं परमेश्वरप्राप्तीचीं अनेक साधनें आहेत त्यांचा अंगिकार करून त्यांमध्यें यश संपादन केलें तरी सद्गुरूच्या कृपेवांचून खऱ्या परमात्मतत्वाची कोणासही ओळख पटावयाची नाहीं. हा श्रेष्ठजनसंमत सिद्धांत आहे. याच सिद्धांताचा आधार घेऊन अलीकडे बरीच गुरुपरंपरा माजली आहे. ज्याच्या कृपाप्रसादानें परम पदाची प्राप्ती होते तो सद्गुरु कसा असावयास पाहिजे याबद्दल एकनाथ, ज्ञानदेव, रामदास, मुक्तेश्वर, तुकाराम, नामदेव, जयराम, गेंदोबा, मुकुंदराज, श्रीधर, श्रीव्यास, वसिष्ठ, वाल्मिकी इत्यादि महात्म्यांनीं पूर्णपणें स्पष्टीकरण केलेंच आहे. त्याचप्रमाणें बायकांनीं गुरु करावा किंवा नाहीं व गुरूंनीं बायकांना उपदेश द्यावा कीं नाहीं याबद्दलचेंही नृसिंहसरस्वतीसारख्या महात्म्यांनीं यथायोग्य विवेचन केलेलें आहे. पण, त्या महाजनांच्या वचनाचा कांहींच विचार न होतां अलीकडे आमच्या देशांत गुरु आणि शिष्य यांची गर्दी उसळून राहिली आहे हें आर्यावर्ताचें दुर्दैव होय. लोकांना गुरूच्या बाह्य लक्षणांचें ज्ञान झालेलें असल्यामुळें हल्लीं सद्गुरु पैशापासरी झालेले दिसतात. एक पैशाच्या कावेनें रामदास बनण्याची सोय झाली आहे. तीन आण्याच्या खडावाच्या साधनानें एकनाथ होता येतें. मुंड्यामुलासारखी टोपी, कफनी, जटा, कुबडी, रुद्राक्ष, तुळशीच्या स्मरण्या, भस्म, मुद्रा, इत्यादि चिन्हांवरच हल्लींचें सद्गुरुत्व अवलंबून राहिलें आहे. आधिभौतिक शास्त्राच्या उन्नतीनें तर या गुरूच्या पदवीस मोठेंच सहाय्य केलें आहे. योगाचीं आसनें करण्याचें सोंग दाखवून, हरीकीर्तनाचें थोथांड उभारून अनेक गुरु हजारों शिष्यांची जोड करीत आहेत. पण हा सर्व पोटाचा धंदा आहे ही गोष्ट फार थोडे लोक जाणतात. चारितार्थ चालविण्याच्या अनेक धंद्यांपैकीं विद्यमान काळचें गुरुत्व हा एक नवीन धंदा झाला आहे. हल्लींच्या सद्गुरूंना सवारुपाया अर्पण केला आणि सरासरी सहा साडेसहा पैशास एक याप्रमाणें बारा किंवा तेरा अक्षरी मंत्र पदरांत पडला कीं, अलीकडे मुक्तीचीं कपाटें उघडूं लागलीं आहेत. ज्यांना पतिवांचून अन्य कोणाची सेवा करणें किंवा उपदेश घेणें ह्या गोष्टी निरयास पोंचविणाऱ्या आहेत अशा स्त्रिया देखील हल्लींच्या गुरुमंत्राच्या भक्ष्यस्थानीं पडत आहेत हें पाहून कोणासही कींव येण्यासारखी आहे. हुषार पण घरबशा लोकांना या गुरुपदाच्या भोंदुकीनें दुबळ्या जनास फसवून आपापल्या कुटुंबाचीं पोटें जाळावयाचीं असतील तर त्यांच्या चरिता-

थांच्या आड येण्याची आमची इच्छा नाहीं. कारण जागतीं मनुष्यें असल्या अर्वाचीन व प्रापंचिक गुरूंच्या पायावर माथा ठेवून आपली हानी करून घेणारच नाहींत असा आम्हांस भरंवसा आहे. पण या गुरूंच्या नादी लागणाऱ्या अप्रबुद्ध मनुष्यांना ज्ञान नसल्यानें तीं नादावून आपलें वित्त गमावितात आणि त्याबरोबरच आमच्या सद्‌गुरुत्वाच्या थोर पदाला व सज्जनांच्या व्याख्यांना हरताळ लागून आमच्या सनातन धर्माचा जगतामध्यें उपहास होतो आहे. एतदर्थ या नटव्या गुरूंना भुलणाऱ्या माणसांनीं सद्‌गुरूंच्या व्याख्यांचा अर्थ समजून घ्यावा अशी त्यांना आम्ही प्रार्थना करितों. गारोड्यासारखी कसरत करणें, कांहीं अद्‌भुत चमत्कार करून दाखविणें, जादु, टोणा, मंत्र, तंत्र, भालदोऱ्या, अंगारे, वशीकरण इत्यादि साधनांनीं गुरुपदाची योग्यता प्राप्त होत नसते. या आमच्या म्हणण्याची सत्यता पटून सद्‌गुरुत्वाच्या अधिकारास कोणत्या गुणाची आवश्यकता आहे याचें ज्ञान होऊन अज्ञान, भोळे, भाविक, उतावीळ, अशा जनांची फसवणूक होऊं नये अशी ज्यांची इच्छा असेल त्यांनीं चांगदेवाचें चरित्र ध्यानांत घेऊन आपापले संशय फेडून घ्यावेत.

चांगदेव हा असा तसा कोणी सामान्य पुरुष नव्हता. ब्रह्मदेवाच्या एका प्रहरांत जे चवदा इंद्र होऊन गेले ते सर्वजण आपल्या विचित्र कर्मबंधानें बंदिखान्यांत पडले. कांहीं आकस्मिक प्रसंगानें त्या बंदिवासांतील इंद्रांना नारदस्वामींचें दर्शन घडलें. त्या सर्व इंद्रांनीं देवर्षीला नमन केल्यानंतर बहुत त्रस्त झालेल्या चांगा नांवाच्या इंद्रानें ब्रह्मकुमाराला हात जोडून आपल्या पापक्षालनाचा व सुटकेचा उपाय विचारिला. चांगाची विनंति ऐकून नारदानीं त्याला सांगितलें, "बाबारे, अमरपुरीं, किंवा सत्यलोकीं जे प्राणिगण वास करितात त्यांना मोक्ष साधणार नाहीं. मोक्षप्राप्तीकरितां मृत्युलोकांतच जन्म धारण केला पाहिजे. कर्मभूमीवर पंढरी नांवाचें पुण्यक्षेत्र आहे. त्याला भूवैकुंठ अशी संज्ञा आहे. त्या ठिकाणीं साक्षात् परब्रह्म विटेवर उभे राहिलें आहे. पांडुरंगाच्या कृपेनें आणि संतसमागमाच्या लोभानें त्या ठिकाणी अनेक नारीनर जीवनमुक्त झाले आहेत. याकरितां तुला मोक्ष प्राप्त करून घ्यावयाचा असेल तर तूं भुलोकीं अवतार धारण कर" ही नारदोक्ती ऐकून चांगाइंद्रानें नारदस्वामीस प्रणिपात घातला. त्या देहापासून त्याची मुक्तता होण्याकरितां नारदांनीं त्याला द्वादशाक्षरी मंत्राचा उपदेश केला. गंगातीरीं पुण्यस्तंभामध्यें चांगाइंद्रानें ब्राह्मणवंशांत अवतार धारण केला. त्याच्या आईबापाचें नांव अनुक्रमे रुक्मिणी, विठोबा असें होते. आपल्या पोटीं देदीप्यमान बालकाचा जन्म झालासे पाहून त्या जोडप्यास परमानंद वाटला. त्यांनीं त्याचें नांव चांगदेव असें ठेविलें. चांगदेव आठ वर्षांचा होतांच त्याचा व्रतबंध झाला, पुढें त्याचा विवाहही झाला. या चांगदेवानें सर्व विद्यांची मोठी पैदास केली. तो इच्छागामी बनला. तो बोलेल तें खरें होऊं लागलें. त्याचें जेथें पाऊल पडेल त्या ठिकाणीं सर्व सिद्धी खुषीनें लोळूं

लागल्या. चौदा विद्या आणि चौसष्ठ कला चांगदेवाच्या अंकित होऊन राहिल्या. यम, प्राणायाम यांतही त्यानें अपूर्व यश संपादिलें. याप्रमाणं शंभर वर्षें होतांच त्याचा मरणकाळ येऊन ठेपला. तेव्हां त्या महात्म्यानें आत्मा ब्रह्मांडीं नेऊन कालवचनाही करून दाखविली. असा प्रकार एकदां नाहीं दोनदां नाहीं तर अशा सामर्थ्यानें चांगदेव चौदाशें वर्षें जगला तरी त्याच्यावर काळाचें सामर्थ्य चालू होईना. त्याला म्हातारपणाचा स्पर्शही झाला नाहीं. चांगदेवाचा लौकिक बहुत वाढला. तशांत तो पंढरीचा वारकरी बनून कीर्तन करूं लागला. तो आपल्या स्वानंदाच्या भरांत नित्य शांत असे. त्यानें तापीच्याकाठीं आपला मठ उभारिला आणि उपासनेचा पसारा मांडिला.

हल्लींच्याकाळीं पद्मासन, मयुरासन, एखादी मुद्रा, विंचवाचा मंत्र, दृष्टीचा अंगारा, मेस्मरिझमचा प्रयोग, नजरबंदी, मुलाबाळांची तंत्रें, संतती प्राप्तीची भूर्जपत्रावरील यंत्रें अशा साधनांच्या द्वारानें जर हजारों शिष्य भुलवावयास येतात तर चांगदेवासारख्या सर्व गुण, मंत्र–तंत्र, सिद्धि, विद्या कला-योग यांच्या निधीला किती शिष्यजन हुरळतील याचा अदमास तरी करवेल काय ? चांगदेवानें उपासना देऊन लाखों शिष्य तयार केले. आपल्या शिष्यासह चांगदेव ऊर्ध्वपंथानें देखील गमन करीत असे. अशा प्रकारच्या अलौकिक सामर्थ्यानें पूर्ण संपन्न अशा चांगदेवासही अद्याप खऱ्या सद्गुरुचें पद प्राप्त झालें नव्हतें ही गोष्ट आधुनिक गुरु-शिष्यांनीं अवश्य ध्यानांत ठेवून चालावें असें आम्ही नम्रतेनें सुचवितो.

असो; आपल्याला अनुकूल असलेल्या सिद्धींचें सामर्थ्य दाखवून चांगदेवानें असंख्य सांप्रदायी केले. पण त्याच्या स्वतःवर सद्गुरुचा प्रसाद झाला नसल्यानें तो अद्यापही परमपदास योग्य झाला नव्हता. त्याला आपल्या सामर्थ्याचा गर्व चढला होता. त्याला गुरु करण्यास कोणी योग्य महात्माच आढळून येईना; याप्रमाणें स्थिति प्राप्त झाली असतांना चांगदेवाच्या कानावर कर्णोपकर्णी ज्ञानेश्वराची वार्ता जाऊन धडकली. चांगदेवानें लागलीच ज्ञानेश्वरास पत्र लिहून त्याची माहिती आणविण्याची योजना केली. दऊत लेखणी घेऊन चांगदेव पत्र लिहिण्यास बसला. पत्र लिहिण्यास प्रारंभ करतांनाच ज्ञानेश्वराला मायना कोणता लिहावा या विचारानें चांगदेव प्रथमारंभींच गोंधळला. ज्ञानेश्वराला 'तीर्थरूप' म्हणून लिहावें तर आपल्याकडे लहानपणा येतो. चिरंजीव म्हणून लिहावें तर ज्ञानेश्वर लहान ठरून आपणाला उपदेश देण्यास अयोग्य ठरतो. अशा कल्पनेनें चांगदेव गोंधळला असतां त्यानें ज्ञानेश्वराकडे कोराच कागद पाठविण्याचा निश्चय ठरविला. लागलीच कोऱ्या कागदाची घडी करून त्यानें आपले शिष्य ज्ञानेश्वराकडे रवाना केले.

अलकावतीमध्यें ज्ञानेश्वर सप्रेम भजनांत गुंग झाले आहेत अशा समयास चांगदेवाचे शिष्य आकाशमार्गानें येऊन त्या ठिकाणीं अवतीर्ण झाले. त्या शिष्यांना समीप आलेले पाहून ज्ञानेश्वरांनीं एकदम उद्गार काढले कीं, "तुम्हाला चांगदेवानें इकडे पाठविलें आहे." ज्ञानेश्वरानें अंतर्ज्ञानानें आपणांस ओळखलें हें पाहून ते शिष्य

चकीत झाले. त्यांतील मुख्यानें नमस्कार करून तें पत्र ज्ञानेश्वरापुढें ठेविलें. ज्ञानेश्वरानें पत्र उघडून पाहतां तो नुसता कोरा कागद आहे असें जाणून उद्गार काढले की, "अरेरे, चांगदेव चौदाशें वर्षें यमाचें पाश चुकवून अखेर या कागदाप्रमाणें कोरा-करकरीतच राहिला आहे! संतान–रहित कांता, पर्जन्यावांचून मेघडंबर, सामर्थ्यरहित पुरुष ही जशी व्यर्थ, त्याचप्रमाणें गुरुपदेशाच्या अभावीं चांगदेवाचीं चौदाशें वर्षें व्यर्थ झालीं."

इतके शब्द उच्चारून ज्ञानदेवानें चांगदेवास अशा मजकुराचें उत्तर लिहिलें कीं, "सर्वभूतांच्या ठिकाणीं सर्वगत चैतन्य एकच आहे. तें वडील नाहीं, धाकटें नाहीं, दीर्घ नाहीं, खुजें नाहीं, परिवारी नाहीं. एकटें नाहीं, दूरही नाहीं आणि निकटही नाहीं. ब्रह्मांडाच्या ठिकाणीं असणारे सर्व पदार्थ आपल्या पिंडाच्या ठिकाणीं वास्तव्य करितातच. पण अविद्येमुळें आपणास त्याचें ज्ञान होत नाहीं. आकाशामध्यें अभ्राची दाटी झाली तरी आकाशाच्या विस्तारांत कमीजास्तपणा येत नाहीं. सर्व विश्वाचें जें बीज तें आपलें आपल्याजवळ वास करितें ही गोष्ट आपली माया–भ्रांति उडाल्या-वांचून आपणास समजणार नाहीं."

अशा मजकुराचें उत्तर लिहून ज्ञानेश्वरानें चांगदेवाच्या शिष्याला त्याच्याकडे परत पाठविलें. चांगदेवानें तें पत्र वाचतांच त्याला अनुभवाची साक्ष पटली. चांगदेवास ज्ञानेश्वराच्या दर्शनाची जबर वांछा उद्भवली. त्यानें लागलीच आपल्या चौदाशें शिष्यांना पाचारण केलें. ज्ञानेश्वराला आपलें अद्भुत सामर्थ्य दाखवून थक्क करावें या अंतस्थ हेतूनें चांगदेव व्याघ्रावर आरूढ झाला; त्यानें हातामध्यें महा भुजंगमाचा चाबूक धारण केला, आणि सर्व छात्रांसह तो अलकावतीच्या रोखानें चालला.

त्या सुमारास अलकावतींमध्यें ज्ञानेश्वर एका भिंतीवर लीलेनें बसले होते. मार्गस्थ वाटसरूंनीं ज्ञानेश्वराला चांगदेवाचा सर्व थाट समजावून दिला. तो मजकूर ध्यानांत घेऊन ज्ञानेश्वरानें त्या सर्व विद्यासंपन्न चांगदेवाला सामोरें जाण्याची तयारी केली. व्याघ्राचें वाहन करून येणाऱ्या चांगदेवाला सामोरा जावयाचें तें तशाच अनुरूप थाटानें गेलें पाहिजे असें जाणून त्यांनीं त्या निर्जीव भिंतीलाच चालण्याची आज्ञा केली. ज्ञानेश्वरासारख्या अभेदभक्ताची आज्ञा भंग करण्यास ईश्वरही समर्थ नाहीं. मग त्या भिंतीची ती कथा काय? लागलीच ती भिंत चालावयास लागली. ज्ञानेश्वर भिंतीसह गांवाबाहेर येतात तर चांगदेवानें त्यांना समोरून पाहिलें. हा अद्भुत चमत्कार पाहून चांगदेव चकित झाला. मातीच्या निर्जीव वस्तुला सजीव करून दाखविणाऱ्या सद्गुरु ज्ञानेश्वरापुढें आपण जिवंत व्याघ्रावर बसून जाण्यांत कांहींच फुशारकी नाहीं अशी खात्री होऊन चांगदेवाचा सर्व गर्व गलित झाला. रुक्मिणीनें सीतेचें रूप धारण केलेलें पाहतांच लज्जित झालेल्या सत्यभामेप्रमाणें लज्जायमान होऊन चांगदेवानें व्याघ्राचा त्याग केला आणि निरभिमान वृत्तीनें लोटांगणें घालीतच तो ज्ञानेश्वरासंनिध जाऊन पोंचला.

# श्री ज्ञानदेवाचा अमृतानुभव

—गुरुदेव रानडे

( २ )

**श्रीज्ञानेश्वरांनीं सुमारें सहा-सातशें वर्षांपूर्वी 'अमृतानुभव' ह्या साक्षात्कारी महाग्रंथाची रचना केली. त्या ग्रंथराजाचें महात्म्य साक्षात्कारी संत गुरुदेव रानडे ह्यांनी आपल्या अधिकारवाणीनें सुंदर रीतीनें विशद केलें आहे.**

**६ प्रकृतिपुरुषाचें ब्रह्मांत ऐक्य**

प्रकृति व पुरुष ब्रह्मांत रहातात व त्याच्या प्रकाशानेंच प्रकाशीत होतात. अनादिकालापासून हीं दोघें एकरुपानें ब्रह्मांत वसत आहेत, असें श्रीज्ञानदेवांचें मत आहे. हीं दोन्ही आपल्या स्वरूपाची आटणी अथवा लय एकाच ब्रह्मांत करतात व पुन्हा विलासाकरितां अर्धी अर्धी होऊन हें जग निर्माण करतात. द्वैत किंवा स्त्री-पुरुष हा भेद केवळ नाममात्र आहे. वस्तुतः, फक्त एक ब्रह्मच केवल शिवरूपानें वसत आहे. दोन काठ्या एकमेकींवर आपटल्यानें एक आवाज निर्माण होतो किंवा दोन बांबूच्या काठ्यांनीं एक वीणा तयार करतात किंवा दोन ओठांतून एक शब्द बाहेर पडतो. किंवा दोन डोळ्यांनीं एकच दृश्य दिसतें. त्याप्रमाणें प्रकृति-पुरुष मिळून एक जग निर्माण करतात. प्रकृति-पुरुषाचे निराळे भाग एकमेकांत मिसळलेले किंवा कालवलेले असले, तरी ते दोन दिसतात; तरी वस्तुतः तीं अनादिकालापासून अद्वैत आत्म्याचा शाश्वत आनंद व ऐक्य उपभोगीत असतात. म्हणून तीं तत्त्वतः एकच आहेत. तीं एकमेकाहून भिन्न नाहींत. साखर गोडीहून भिन्न नाहीं. सूर्य आपल्या प्रकाशामुळें तळपतो; परंतु, प्रकाशाचा गाभा किंवा सार म्हणजे सूर्यच होय. वायु व त्याची गति, सोनें व त्याचें तेज, कस्तुरी व वास, अग्नि व त्याची उष्णता, हीं जशीं एक आहेत त्याप्रमाणेंच प्रकृति-पुरुष व शिव-शक्ति तत्त्वतः एक आहेत. दिवस व रात्र दोन्ही मिळून सूर्यास त्याच्या घरीं भेटावयास गेल्यास, तीं दोन्ही नाहींशीं होतील; त्याप्रमाणेंच प्रकृति-पुरुष या सापेक्ष कल्पना निरपेक्ष ब्रह्माच्या

ऐक्यांत नाहींशा होतात. व्याकरणदृष्ट्या समुद्र व गंगा पुल्लिंगी व स्त्रीलिंगी म्हणून दोन वाटले तरी गंगा समुद्रांस मिळाल्यावर त्यांच्या पाण्यामध्यें भेद मुळीं राहत नाहीं; त्याप्रमाणें प्रकृति–पुरुष स्त्री–पुरुषाप्रमाणें भिन्न वाटले तरी स्वरूपतः एक आहेत. सोन्याच्या दागिन्यांनीं सोन्यास ऐक्यभावानें नमन करावें, त्याप्रमाणें श्रीज्ञानदेव भूतेश व भवानी, पुरुष व प्रकृति यांना ऐक्यभावानें नमन करितात. मिठाचा खडा आपला घनपणा व लघुता टाकून समुद्राच्या पाण्याशीं एकरूप होतो, त्याप्रमाणें अहंकाराचा त्याग केल्यानें श्रीज्ञानदेव शंभूशीं व शांभवीशीं एकरूप झाले.

### ब्रह्म अथवा आत्मा याचें वर्णन

मागील परिच्छेदामध्यें पुरुष–प्रकृति या सापेक्ष कल्पना किंवा तत्त्वें असून तीं या दोहोंपलीकडे असलेल्या व या दोहोंस आधाभूत अशा केवळ व निरपेक्ष अंतिम तत्त्वाकडे आपल्यास नेतात; व या तत्त्वास ब्रह्म किंवा आत्मा असें कांहींहि म्हणतां येईल, हें आपण पाहिलें. आतां आपण या अंतिम तत्त्वाचें स्वरूप काय याचा विचार करूं. आत्मा सर्व वस्तूंपेक्षां निराळा व स्वतंत्र आहे; तो सर्वद्रष्टा आहे; कोणास दिसत नाहीं, तरी सदैव व्यक्त आहे, असें सांगण्यांत येतें. हें जर खरें असेल, तर तो असत् आहे किंवा नाहींसा होतो असें कसें म्हणतां येईल? अनात्मवादी किंवा नास्तिक लोक "आत्मा नाहीं" असा आरोप आत्म्यावर करतात व तो आत्मा शांतपणें ऐकतो व सहन करतो. कारण प्रत्यक्ष कृतींत ते त्याच्या म्हणण्याविरुद्ध वागतात. ते आपल्या स्वतःचें अस्तित्व ग्रहीत धरितात व त्यावरून आत्म्याचें अस्तित्व आपोआप सिद्ध होतें. जो आत्मा गाढ अज्ञानानें जड व सूक्ष्म जगत् पूर्णपणें झांकून टाकणाऱ्या निद्रेचा साक्षी आहे, जो सर्वज्ञ आहे तसाच जो दृश्य जगानें आकळला जात नाहीं अशा आत्म्यास अस्तित्व नाहीं, असें सिद्ध करणें शक्य आहे काय? वेद प्रत्येक गोष्टीबद्दल बोलतो, परंतु सत् व असत् या दोहोंपलीकडे असलेल्या आत्म्याबद्दल तो कांहींच बोलत नाहीं; सर्व जगांतील वस्तूंना दाखविणारा सूर्य आत्म्यास दाखवूं शकत नाहीं; सर्व वस्तूंना व्यापणारें आकाश आत्म्यास व्यापूं शकत नाहीं. प्रत्येक देह म्हणजे हाडाचा सांपळा; अहंकार मोठ्या आतुरतेनें अशा सर्व देहांस आपलासा करितो; परंतु, त्या अहंकारापलीकडे असलेल्या आत्म्यास तो शिवूं शकत नाहीं. बुद्धि ज्ञेय अशा सर्व गोष्टींचें ग्रहण करिते: पण आत्म्यापुढें लटपटूं लागते. अनेक गोष्टींची कल्पनाकरणारें मन आत्म्यापासून फार दूर राहतें. इंद्रियांची प्रवृत्ति सदैव निरर्थक वासना तृप्त करण्याकडे धांवत असते. अरण्यांतलि श्वापदें माळरानावरील गवत खाण्यांतच रमतात. या इंद्रियांना आत्मानंद

चाखणें केवळ अशक्य आहे. ज्या अज्ञानानें हें जग निर्माण केलें, त्या अज्ञानासहित सर्व जग गिळून टाकणारें आत्मतत्त्व किंवा ब्रह्म पूर्णतया जाणणें शक्य आहे काय ? सर्व वस्तूंची रुचि चाखणारी जीभ स्वतःची रुचि चाखूं शकत नाहीं; जें स्वतःचेंहि ज्ञेय होऊं शकत नाहीं असें शुद्ध ज्ञानरूपी ब्रह्म कोणासहि जाणतां येणार नाहीं. आपल्या स्वतःस पाहावें या इच्छेनें हा जो बद्ध होत नाहीं तो आत्मा दुसऱ्या कशानेंहि बद्ध होईल काय ? आपल्या स्वतःच्या सांवलीपुढें पळण्याचे सर्व प्रयत्न जसे निष्फल आहेत, तसेंच आत्म्याचें स्वरूप निश्चितपणें ठरविण्याचे सर्व प्रयत्न निष्फळ होतात. म्हणून आत्म्याचें वर्णन जें शब्दांनीं किंवा उपमेच्या साहाय्यानें करतात, ते आत्म्यापासून फार दूरच रहातात; कारण आत्म्याचें खरें वर्णन करतां येत नाहीं. आत्मा सर्व शब्दांच्या पलीकडे आहे, इतकेंच नव्हे तर तो सर्व बौद्धिक आकलनाच्या आंवाक्याबाहेर आहे. परंतु, या आत्म्याच्या साहाय्यानेंच जीवास आपलें अज्ञान घालवून देतां येतें व आत्मानंदाचा उपभोग घेतां येतो. आत्मा द्रष्टा असला तरी तो कोणत्याहि दृश्य वस्तूंशीं सापेक्ष नाहीं. ऐक्य हें द्वैताशीं सापेक्ष आहे. आत्म्यामध्यें ऐक्याची कल्पनादेखील नाहीं. तेव्हां पाहण्याचें कार्य त्याच्याकडून कसें घडेल ? याप्रमाणें अंतिम तत्त्व म्हणजे आत्मा हा सर्वज्ञ व सर्वसाक्षी आहे. तो सत्, असत्, अहंकार, इंद्रियें, मन व बुद्धि या सर्वांपलीकडे आहे; शब्दांनीं त्याचें वर्णन करतां येत नाहीं; तो इंद्रिय-जन्य व बुद्धि-ग्राह्य ज्ञानापलीकडे आहे.

## ८. सत्ता, प्रकाश व सुख या त्रिगुणापलीकडे ब्रह्म

ब्रह्मामध्यें सत्, प्रकाश व सुख हे तीन गुण संभवत नाहींत. पाश्चिमात्य तत्त्वज्ञ स्पिनोझा, Attribute हा शब्द ज्या अर्थी वापरतो, त्या अर्थी 'गुण' हा शब्द येथें वापरला आहे, असें म्हणतां येईल. गुण म्हणजे बुद्धीच्या एका दृष्टिकोनांतून प्रतीत झालेलें ब्रह्माचें स्वरूप होय. म्हणून जरी असे अनंत गुण ब्रह्मांत एकाच वेळीं वसत असले, तरी या गुणांच्या साहाय्यानें निर्गुण ब्रह्मस्वरूपाचा निर्णय करतां येणार नाहीं, हेंच येथें श्रीज्ञानदेवांना सांगावयाचें आहे. ज्याप्रमाणें कनक, काठिण्य आणि पिवळेपणा हीं तिन्हीं मिळून एक कनक बनतें; किंवा द्राव, गोडी व सफेतपणा मिळून एक अमृत होतें; शुभ्रता, सुगंध व मऊपणा यांचा एकत्रपणा म्हणजेच कापूर; तसेंच सत्व, रज व तम या गुणांच्या एकत्रपणानें एक वस्तु बनते. त्रिगुणांना स्वतंत्र अस्तित्व नाहीं; त्याप्रमाणें सत्ता, प्रकाश व सुख यांची स्वतंत्र त्रिपुटी अस्तित्वांत नाहीं, तर तीं एकमेव ब्रह्माचें द्योतक आहेत. कापराच्या तीन गुणांनीं कापराच्या सत्य-स्वरूपाचें वर्णन करतां येत नाहीं व म्हणून या दृष्टीनें हे गुण सापेक्षतेमुळें

कापरांत बसत नाहींत असें म्हणतां येईल. त्याप्रमाणेंच सत्ता, प्रकाश व सुख या तीन गुणांनीं ब्रह्मस्वरूपाचें पूर्णतया आकलन करतां येत नाहीं; म्हणून हे गुणहि सापेक्षतेनें ब्रह्मामध्यें वसत नाहींत असें म्हणतां येईल. (अमृत ५·१–७) हे गुण म्हणजे ब्रह्माकडे मानवी बुद्धीनें पाहण्याचे प्रकार आहेत. ब्रह्म पूर्ण निरपेक्ष (absolute) आहे; म्हणून या त्रिगुणांचा त्याच्यावर कांहींच परिणाम होत नाहीं. आम्हीं मानव आपल्या दृष्टीनें चंद्राच्या कला वाढतात व कमी होतात असें म्हणतों. परंतु, चंद्र नेहमीं आहे तसा पूर्ण असतो, वाढतहि नाहीं व कमीहि होत नाहीं. आमच्या दृष्टीनें पाहण्याचा त्याच्या सत्य स्वरूपावर कांहींच परिणाम होत नाहीं. त्याप्रमाणेंच आमच्या बुद्धिमत्तेनुरूप सत्ता, प्रकाश व सुख इत्यादि गुणांनीं ब्रह्म-स्वरूपाचा निर्णय करण्याचा आम्ही प्रयत्न करतों. पण याचा ब्रह्माच्या स्वरूपावर कांहींच परिणाम होत नाहीं. ढग ज्याप्रमाणें पाऊस पाडून त्यांतच लीन होतात किंवा प्रवाह समुद्रास मिळून त्यांत लुप्त होतात अथवा मुक्काम गांठून रस्ते संपतात, त्याप्रमाणें ब्रह्माचीं शाब्दिक वर्णनें ब्रह्माचा निर्देश करून त्यांतच लीन पावतात. फळास जन्म देऊन फूल सुकून जातें; रस देऊन फळ नाहींसें होतें; किंवा संतोष देऊन रस नाहींसा होतो; किंवा अग्नींत आहुति टाकून याज्ञिकाचा हात माघारी परततो, किंवा श्रोत्यांच्या मनांत आनंदलहरी उत्पन्न करून गोड सूर आकाशांत नाहींसा होतो किंवा प्रतिबिंब दाखवून आरसा अदृश्य होतो; त्याप्रमाणें सत्, चित्, आनंद हीं तीन उत्तम पदें द्रष्ट्याला म्हणजे ज्ञात्याला आपलें यथार्थ परमात्मरूप दाखवून आपण मौनाच्या वाटेस लागतात. जें बोलण्यांत येतें तें आत्म–तत्त्व नव्हे व जें आहे तें बोलवत नाहीं. सांवलीवरून मूळ स्वरूपाचें माप घेववत नाहीं. म्हणून ब्रह्म शब्दातीत आहे. ब्रह्म सत्, चित्, सुख इत्यादि किंवा तद्विरुद्ध सापेक्ष कल्पनांच्या पलीकडे आहे. तें सत् किंवा असत् नसून या दोहों पलिकडचें केवळ सत् आहे; जें चित् किंवा अचित् नाहीं, तर चिदचित्च्या पलिकडचें केवळ चित् आहे; तें आनंद किंवा निरानंद नसून या दोहोंपलीकडे असलेला केवळ आनंद आहे. तें परस्परविरोधी द्वंद्वांतील, सापेक्ष कल्पनांपलीकडे, संख्येनें एक नव्हे, तर केवळ अद्वितीय एकच आहे.

## ९. नास्तिकवाद्यांविरुद्ध ब्रह्माच्या अस्तित्वाचा सिद्धांत.

दुसऱ्या कोणत्याहि तेजोमय पदार्थानें मार्गे टाकला जात नाहीं व अंधारानें कधींच झांकला जात नाहीं अशा सूर्याचीच उपमा ब्रह्मास देतां येईल; कारण ब्रह्म ज्ञानानें उजळत नाहीं किंवा अज्ञानानें झांकलें जात नाहीं. तसेंच ब्रह्मास स्वतःची जाणीव नसते. कारण ब्रह्मास स्वतःची जाणीव आहे असें मानलें, तर कांहीं वेळ त्यास आपल्या स्वतःचें अज्ञान होतें असें अनुमान निघतें; कारण ज्ञान हें केव्हांहि अज्ञानाशीं सापेक्ष आहे. पण असें मानणें मूर्खपणाचें होईल. ब्रह्माचें अस्तित्व अशा विलक्षण स्वरूपाचें आहे कीं, त्यांत सत् व असत् ही दोन्ही कोटीं ठरतात. परंतु, ब्रह्माचें अस्तित्वच

मुळीं नाहीं, असें म्हणतां येणार नाहीं. कारण असा अनुभव कोणाचाच नाहीं. शिवाय, कोणत्या वस्तूच्या अस्तित्वाच्या आधारावर 'ब्रह्म हें कांहींच नाहीं व त्याचें अस्तित्व संभवत नाहीं.' असें म्हणावयाचें ? असें श्रीज्ञानदेव विचारतात. कोणत्याहि एखाद्या वस्तूचें अस्तित्व अथवा नास्तित्व ठरवावयाचें झाल्यास एखाद्या तत्त्वाचें अस्तित्व अत्यंत आवश्यक आहे, असें श्रीज्ञानदेव प्रतिपादतात. ब्रह्माचें अस्तित्व अनन्यसाधारण व विलक्षण आहे. एका विशिष्ट पद्धतीनें तें असतें असें नाहीं व त्याचें नास्तित्व तर संभवतच नाहीं. ब्रह्माचें अस्तित्व नाहीं असें मानण्याचें कारण असें कीं, तें स्वतःस किंवा इतर कोणासहि ज्ञेय नाहीं. त्याचें अस्तित्व शुद्ध व केवल आहे व म्हणून तें सत व असत या दोहोंच्या पलीकडे आहे. निर्मनुष्य अरण्यांत झोपी गेलेला मनुष्य जसा स्वतःस किंवा इतर कोणासहि ज्ञेय न होतां असतो, त्याप्रमाणें ब्रह्म आपल्या परीनें असतें. अस्तित्वाची किंवा नास्तित्वाची मुळींच जाणीव नसतां ब्रह्म असतें. पृथ्वीच्या आंत खोल ठिकाणापर्यंत खणूनहि दृग्गोचर न झालेल्या झऱ्याप्रमाणें ब्रह्म स्वतःस किंवा इतरांस ज्ञेय वस्तु न होतां स्वयंपूर्ण राहते. याप्रमाणें ब्रह्म सापेक्ष अस्तित्वानास्तित्वाच्या पलीकडे स्वयंपूर्ण स्थितींत असतें.

### १०. अवर्णनीय ब्रह्म

जर्मन तत्त्वज्ञानी कांट निर्विशेष वस्तूबद्दल बोलतो, त्याप्रमाणें श्रीज्ञानदेव ब्रह्माचें वर्णन करितात. तें सर्व शास्त्रांना अज्ञात राहतें; त्याची दुसऱ्या कोणत्याच वस्तूशीं तुलना करतां येत नाहीं; सूर्य जसा सूर्यासारखा, चंद्र चंद्रासारखा आणि दिवा दिव्यासारखा अनन्यसदृश असतो, तसें ब्रह्म ब्रह्मासारखें आहे. न लावलेल्या उंसाची गोडी ऊंसच जाणतो, त्याप्रमाणें ब्रह्माची अस्तित्वाची पद्धत ब्रह्मच जाणतें. किंवा वीणा वाजविली नसतां तिचा नाद वीणाच जाणते; फूल अस्तित्वांत आलें नसतांनाहि त्याच्या परिमलाची गोडी जाणण्यासाठीं त्याचे पराग व सुगंध यांनाच भ्रमर व्हावें लागतें; न शिजविलेल्या पक्वान्नाची गोडी त्या पक्वान्नास ज्ञात असते; किंवा अमावास्येच्या दिवशीं भर माध्यान्हीं चंद्राचें अस्तित्व चंद्रच जाणतो. कोणताहि आकार धारण करण्यापूर्वी असलेल्या सौंदर्याप्रमाणें ब्रह्माचें अस्तित्व आहे; कोणतेंहि सत्कृत्य करण्यापूर्वी त्याच्या पावित्र्या–पुण्याप्रमाणें तें असतें. मन उत्पन्न होण्यापूर्वी मनावर अवलंबून असलेल्या दुर्दम्य होणाऱ्या वासनांचें वर्णनाप्रमाणें ब्रह्माचें वर्णन करतां येईल. तें कोणतेंहि तंतुवाद्य निर्माण होण्यापूर्वी त्यांत वसत असलेल्या नादाप्रमाणें ब्रह्म असतें; लांकडांना जाळून परत आपल्याच ठायीं आपण राहणाऱ्या अग्नीप्रमाणें तें असतें. सामान्य व विशेष यांच्यापलीकडे ब्रह्म आत्मरत स्थितींत राहतें. ब्रह्माच्या बाबतींत मौन म्हणजेच उत्तम भाषण ठरतें. सर्व वस्तूंप्रमाणें ब्रह्माचें अस्तित्व सिद्ध करतां येत नाहीं असें श्रीज्ञानदेव सांगतात; सर्व उपमा व रूपकें यांना त्याचें स्वरूप विशद करतां येत नाहीं; सर्व सूक्ष्म विचार व शास्त्रीय लक्षणें त्यापुढें टिकत नाहींत; सर्व प्रयत्न निष्फल

ठरतात व त्याची पारख व खात्री करून देण्याच्या बाबतींत सर्व अनुभव हताश होताव. विचार आपल्या सर्व निर्णयात्मक शक्तीसह अदृश्य होतो. एखाद्या पराक्रमी वीरानें आपलें जीवदान देऊन आपल्या मालकाचें वैभव प्रगट करावें, त्याप्रमाणें विचारशक्ति मरून ब्रह्माचें महत्त्व प्रसिद्ध करतें. ब्रह्माचें आकलन करण्याचें सामर्थ्य नाहीं, याबद्दल बुद्धीस लाज वाटते. जेथें अनुभवाचा अनुभाव्य व अनुभविता यांसह शवट झाला आणि परावाणी आपल्या ठायींच विरून गेल्यामुळें शब्द स्फुरत नाहीं व ओठांबाहेर येत नाहीं, तेथें वैखरी वाणीनें प्रगट होणाऱ्या शब्दांनीं ब्रह्माचें वर्णन कसें होईल? जागाच आहे त्याला जागृत करणें, जेवला आहे त्यास जेवूं घालणें, सूर्य माध्यान्ही आला असतां दिवा लावणें, जसें अनावश्यक त्याप्रमाणें शब्दांनीं ब्रह्माचें वर्णन करणें अनावश्यक आहे, असें श्रीज्ञानदेव सांगतात.

## शब्दाचें महत्त्व

शब्दाचें महत्त्व काय? ब्रह्माची आठवण करून देण्यांत त्यांना चांगला उपयोग असला, तरी अज्ञानाचा नाश करून ब्रह्माच्या स्वरूपाचें ज्ञान करून देण्याचें सामर्थ्य शब्दांत नाहीं, असें श्रीज्ञानदेवांचें मत आहे. ते प्रथम शब्दाचें महत्त्व काय याचें वर्णन करतात. विस्मरणानें एखादी वस्तु हरवली, तर शब्दानें त्याची आठवण होते व ती वस्तु सांपडते. म्हणून स्मारकपणानें शब्द जगांत कीर्ति व वैभव मिरवतो. याप्रमाणें शब्द अत्यंत उपयुक्त असल्याबद्दल श्रीज्ञानदेव त्याची स्तुति करतात. त्याचा आरशाप्रमाणें उपयोग होत नाहीं काय? असें ते विचारतात. आरशाप्रमाणें जीवात्म्याचें प्रतिबिंब त्यास दाखवून, शब्द त्यास आत्मस्वरूपाची स्पष्ट कल्पना देतो; अज्ञानामुळें आपलें निराकार रूप विसरल्याची स्मृति जीवात्म्याला देतो. परंतु, हा आरसा इतर आरशांपेक्षां भिन्न व असाधारण आहे. कारण यांत डोळस लोकांनाच आपलें प्रतिबिंब दिसतें असें नाहीं, तर आंधळ्यांनाहि त्यांचें रूप दिसतें! शब्द म्हणजे देदीप्यमान सूर्य व अव्यक्त कुटुंबाचें वैभव आहे, असें श्रीज्ञानदेव म्हणतात. त्याच्यामुळें आकाशास त्याचें रूप व गुण प्राप्त झालें. आकाशपुष्पाप्रमाणें शब्द अदृश्य असला, तरी त्याच्यापासून जगाचें फळ निर्माण होतें. कर्माचा मार्ग प्रकाशित करणारा तो दिवा आहे; कर्तव्य कोणतें व अकर्तव्य कोणतें हें तो स्पष्टपणें समजावून सांगतो, असें श्रीज्ञानदेव त्याचें स्वरूप वर्णितात. बंध व मुक्ति यांमध्यें निवाडा करणारा तो न्यायाधीश आहे. तो अविद्येच्या बाजूनें वकिली करूं लागला, कीं अज्ञानानें निर्माण झालेलें जग खरें दिसूं लागतें. शब्द एक मांत्रिक आहे. त्याच्या मंत्रसामर्थ्यानें शिव उपाधीनें बद्ध होतो व आपण जीवात्मा आहों असें वाटूं लागतें. शब्दानेंच जीवास आपलें खरें स्वरूप-ज्ञान होतें. शब्दास सूर्याची उपमा देतां येणार नाहीं. कारण सूर्य आपल्या विरोधी रात्रीच्या अंधाराचा नाश करून आपला प्रकाश देतो; तर शब्द

कर्म व अकर्म हे दोन्ही परस्परविरोधी मार्ग सारखेच एकाच वेळीं प्रकाशित करितो. आत्मज्ञानासाठीं आपला जीव अर्पण करणाऱ्या या शब्दाचे अनंत उत्तम गुण आहेत व त्यांचें वर्णन करणें अशक्य आहे.

## १२. आत्म्याच्या शुद्ध स्वरूपाचें ज्ञान देण्यास शब्द असमर्थ

शब्द स्मरण देण्याविषयीं प्रसिद्ध आहे. ब्रह्माचे ठिकाणीं स्मरणाचाहि संबंध नाहीं. आत्मा स्वसंवेद्य आहे. त्यास शब्दाच्या उपकाराची जरुरी नाहीं. शब्द अविद्येचा नाश करितो व मग आत्मा आत्म्यास भासतों असें म्हणणें मूर्खपणाचें ठरतें. कारण अज्ञानास अस्तित्वच नाहीं. 'जें मुळीं अस्तित्वांतच नाहीं त्याचा शब्द नाश करतो म्हणणें', तसेंच 'स्वयंप्रज्ञ व स्वयंभू (Self-existant) आत्म्याचें ज्ञान शब्दानें होतें' हीं दोन्ही विधानें निरर्थक आहेत. दिवा माध्यान्हीं नसलेला अंधार नाहींसा करतो व स्वयंप्रकाशी सूर्यास प्रकाशित करतो म्हणण्याइतकेंच तें व्यर्थ आहे. दोन्ही प्रकारें शब्द निरर्थक असल्यामुळें, प्रलयकाळच्या पाण्यांत ओढा विरून जावा त्याप्रमाणें शब्द नाहींसा होतो. आत्म्याच्या बाबतींत शब्द निरुपयोगी आहे; कारण आत्म्यामध्यें स्मरण व विस्मरण दोन्ही संभवत नाहींत. एका आत्म्याशिवाय जगांत दुसरें कांहींच अस्तित्वांत नाहीं. ब्राह्मास स्मृति किंवा विस्मृति कशी होणार ? जिभेस आपली स्वतःची रुचि घेतां येते काय ? आत्मा किंवा ब्रह्म स्मृति–विस्मृति या सापेक्ष कल्पनेच्या पलीकडे शुद्ध ज्ञानरूप आहे. शब्द सर्वज्ञ आत्म्यास आपल्या स्वतःचें सानुभव ज्ञान देऊन आपण वैभवशाली होतो असें म्हणणें म्हणजे 'वदतो व्याघात' आहे. हें आपण आपल्याशींच लग्न करणें, सूर्यानें स्वतःस प्रकाशित करणें किंवा आपलें बिंब आपणच ग्रासून ग्रहण लागणें, आकाशांत आकाशच शिरणें, समुद्रानें स्वतःच्या पोटांत स्वतः शिरणें, इत्यादिकांप्रमाणें केवळ अशक्य आहे; किंवा फळास फळ लागणें, सुगंधानें आपलाच वास घेणें व अग्नीनें आपल्या स्वतःस जाळणें अशासारखें अशक्य आहे. चंदन आपली उटी आपल्यासच लावील, रंग आपल्यासच रंगवील किंवा मोती आपल्याच अंगावर मोलाची प्रभा घालील, डोळ्यांनीं डोळ्यांस पाहावें, आरशानें आपल्यासच प्रतिबिंबवावें, किंवा सुरीनें सुरीसच मारावें, असें कधीं घडलें आहे काय ? त्याप्रमाणेंच सर्वज्ञ आत्म्यास शब्दाच्या साहाय्यानें आत्मज्ञान व्हावें हें अशक्य आहे. शिवाय सर्वज्ञ व सर्वकष आत्म्याचें अस्तित्व वा ज्ञान शब्दानें सिद्ध करण्याची मुळींच जरुरी नाहीं. जो स्वयंप्रकाशी व स्वयंसिद्ध आहे, त्या आत्म्यास स्वतः आनंद उपभोगण्यास शब्द मदत करतो, असें मानणें निराधार आहे.

# श्रद्धा आणि सबुरी

## नाथांच्या जीवनांतील कांहीं प्रसंग

एकनाथ महाराजांची गोष्ट आहे ही.

एकदां एका गृहस्थानें नाथांस विचारलें " महाराज, आपलें जीवन किती साधें! किती निष्पाप! आमचें असें कां होत नाहीं! कधीं कोणाशीं तुमचें भांडण नाहीं, तंटा नाहीं. किती शांत, पवित्र, प्रेमळ तुम्हीं!"

नाथ म्हणाले, " माझी गोष्ट तूर्त राहूं दे. तुझ्याविषयीं मला एक गोष्ट कळली आहे. तुझें आजपासून सात दिवसांनीं मरण आहे!"

नाथांनीं सांगितलेली गोष्ट खोटी कोण मानणार? सात दिवसांनीं मरण! फक्त १६८ तास उरले. अरेरे! तो मनुष्य घाईघाईनें घरीं गेला. त्याला कांहीं सुचेना. आतां तो निरवानिरवीच्या गोष्टी बोलूं लागला. धडकी भरली. आजारी झाला. अंथरुणावर पडला. सहा दिवस होऊन गेले. सातव्या दिवशीं नाथ त्याच्याजवळ आले. त्या गृहस्थानें नमस्कार केला.

नाथांनीं विचारलें, " कसें काय आहे?"

तो म्हणाला, " जातों आतां."

नाथांनीं विचारलें, " गेल्या सहा दिवसांत किती पाप झालें? पापाचे किती विचार मनांत आले?"

तो आसन्नमरण गृहस्थ म्हणाला, " नाथ! पापाचा विचार करायला फुरसतच झाली नाहीं. सारखें डोळ्यासमोर मरण होतें."

नाथ म्हणाले, " आमचें जीवन निष्पाप कां असतें याचें उत्तर तुला मिळालें ना?"

नित्य मरणाचें स्मरण ठेवणारा माणूस आयुष्याचा सदुपयोग करण्यासाठीं उतावळा असतो.

### दंडवत स्वामींचें देहविसर्जन

एकनाथ महाराजांच्या एका शिष्याचें नांव होतें दंडवत स्वामी. ते भागवताचे अनन्य भक्त होते.

भागवतांत एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं काय, गाढव, चांडाळ घोडा जो जो प्राणी भेटेल त्याला दंडवत् प्रणाम करावा. दंडवत स्वामींनीं हें वाचल्यानंतर जो कोणी भेटेल त्याला प्रणाम करण्याचा कार्यक्रम सुरूं केला. समोर गाढव दिसलें कीं

केला त्याला प्रणाम. कुत्रा दिसला कीं केला प्रणाम. म्हैस दिसली कीं जोडले हात. असा दिवस रात्र नमस्कार करण्याचा त्यांनीं सपाटा चालवला.

प्रथम प्रथम लोक वेडा समजूं लागले, कांहीं दिवसांनीं ही गोष्ट लोकांच्या परिचयाची झाली आणि दंडवतस्वामींकडूनहि ही प्रणाम करण्याची क्रिया अगदीं सहजतेनें होऊं लागली. ती त्यांच्या अंगवळणी पडली !

पुढें पुढें लोक दंडवतस्वामींना मोठा भगवद्भक्त समजूं लागले. एवढ्यावरच थांबलें नाहीं. त्यांचीहि पूजा लोक करूं लागले. लोकांच्या या पूजेनें दंडवतस्वामी अगदीं त्रस्त झाले !

नम्रता अंगीं बाणवून घेण्याचा अभ्यास व्हावा म्हणून त्यांनीं हा प्रणामाचा कार्यक्रम सुरू केला होता. पण झालें उलटेंच ! ते गोंधळून गेले. त्यांना कांहीं सुचेना. ते नाथांच्याकडे गेले. त्यांनी नाथांना सर्व हकीकत सांगितली व मार्ग सुचवा म्हटलें.

एकनाथ महाराज म्हणाले, "शास्त्र–वचनांचा अक्षरार्थ नसतो घ्यायचा. भावार्थ घ्यायचा असतो. मानसिक भावानें प्रणाम करण्याऐवजीं तूं तर प्रणामाचा कार्यक्रमंच सुरू केलास ! या जन्मांत तुझ्या मागची ही पूजा आतां कांहीं सुटायची नाहीं. त्याला इलाज एकच दिसतो. तूं आपला देह गोदावरी मातेला अर्पण कर म्हणजे झालें !"

दंडवतस्वामींची नाथांवर अपार श्रद्धा होती. त्यांनीं नाथांच्या आज्ञेप्रमाणें आपला देह गोदावरींत झोकून दिला. त्यांना पोहतां येत होतें. त्यामुळें थकून जाईपर्यंत ते पोहत राहिले आणि शेवटीं बुडून मेले.

◆ ◆ ◆

### गाढवांत देव पाहणारे नाथ

एकनाथ महाराज काशीहून गंगेच्या पाण्याच्या दोन कावडी खांद्यावर घेऊन पैठणकडे परत येत होते. जवळपास सहाशें कोसाचा प्रवास झाला होता. त्याकाळीं आजच्या सारख्या मोटारीं, आगगाड्या, विमानें नव्हतीं. रस्तेहि फार चांगले नसत. शिवाय घनदाट जंगलांतून प्रवास करावा लागे.

परंतु भक्त मंडळी काशीच्या गंगेचें पाणी भक्तीनें दक्षिणेच्या समुद्रतीरावरील रामेश्वराच्या चरणीं अर्पण करीत. आणि रामेश्वरच्या सागराचें जल काशी-विश्वेश्वराला मिळे ! हें सर्व भक्तीनें लोक करीत.

नाथ शुचिर्भूत होऊन, हरिनामाचा जप करीत रोज भक्तिभावानें अंतर कापीत कापीत दक्षिणेकडे चालले होते. एका कावडींतील गंगाजळानें ते आपल्या आई–वडिलांना स्नान घालणार होते आणि दुसऱ्या कावडींतील गंगाजळ रामेश्वराच्या अभिषेकासाठीं होतें. पैठणजवळ नाथ पोचले. नाथ पैठणचे राहणारे ! आतां या पाण्यानें आई–वडिलांना स्नान घालतां येईल असा विचारहि त्यांच्या

मनांत चालला असेल. परंतु भर दुपारच्या उन्हांत वाटेवर एक गाढव तळमळतांना नाथांना दिसलें! कसोटी पाहणाऱ्या लबाड ईश्वराची लीला तावडतोब त्यांच्या लक्षांत आली! त्यांनी एक कावड तत्काळ गाढवावर रिकामी केली. त्याला स्नान घालून थंड केलें. व दुसऱ्या कावडींतील पाणी त्याला पाजलें! ते मनांत म्हणाले, "तूंच माझा मायबाप आणि तूंच माझा परमेश्वर!"

समोरच्या जीवाच्या अंतःकरणाची वेदना नाथांना दिसली. तो शांत करणेंच त्यांना धर्म वाटला. कसोटी पाहण्यासाठीं रचलेलें देवाचें हें नाटक नाथांच्या दिव्य नेत्रांना दिसलें. त्यामुळें ते बाह्य विधिविधानांत गुरफटले नाहींत!

★

## नाथांच्या भागवताची परीक्षा

एकनाथांचें भागवत फार प्रसिद्ध आहे. ह्यांत त्यांनीं भागवताच्या अकराव्या स्कंधावर सविस्तर भाष्य लिहिलें आहे. महाराष्ट्रांत गांवोंगावीं हें एकनाथी भागवत, लोक भक्तीनें वाचीत असतात.

नाथांनीं पैठणला ह्या भागवताचे पांच अध्याय लिहिले होते. त्यांच्या एका मित्रानें ते लिहून घेतले व तो ते गाऊं लागला. काशीच्या पंडितांना हें कळल्यावर ते रागावले. त्यांना वाटलें, भागवतासारखा महान् ग्रंथ एक अनधिकारी माणूस मराठींत आणतो हें भलतेंच आहे. त्यांनीं आपली नापसंती प्रगट केली.

मग नाथ काशीला गेले व त्यांनीं तो ग्रंथ पंडितांच्या हातीं सोपविला व म्हटलें, "हा ग्रंथ योग्य आहे असें जर आपल्याला वाटत असेल तर तो ठेवावा. नाहींतर खुशाल गंगेला अर्पण करावा."

नाथांनीं तो ग्रंथ मोठ्या श्रद्धेनें पंडितांना सोपविला व ते जो निर्णय देतील तो मान्य करण्याचें ठरविलें. सत्य वस्तू पुढें मांडून धीर न सोडतां ते शांत राहिले.

काशीच्या पंडितांनीं काय केलें? त्यांनीं नाथांच्या ग्रंथाची परीक्षा करून त्यावर आपल्या मान्यतेचा शिक्का मारला. अशा रीतीनें नाथ कसोटीस उतरले. सत्यालाही धीर धरावा लागतोच.

श्रद्धा आणि त्याचबरोबर सबुरीची—धीर धरण्याची वृत्ति, अंगीं पूर्णपणें बाणावी लागते ती अशी.

★

भौतिक व परमार्थिक उन्नतीचा मार्ग दाखविणारी प्रभावी प्रेरणा, सत्वनिष्ठा, सामर्थ्य व भक्ति यांचा त्रिविध संयोग साधणारी शक्तिदेवता आहे. नामस्मरणानें श्रद्धा, निर्माण होते. व सबूरीनें श्रद्धेचे निष्ठेंत रूपांतर होते. व श्रद्धा, सबूरीचा जाहला जो दास। तिन्ही मुक्ति तेणे साधियल्या—अशी अवस्था प्राप्त होते.

सध्याच्या बहुरंगी व बहुढंगी जीवनपद्धतीनें जीवनाचा आत्मा ( नॅचरल बेस ) नाहींसा झाला आहे. मानवी जीवन कृत्रिम, यांत्रिक व बोजड बनले आहे. केवळ आर्थिक विकासावर भर दिल्यानें मानसिक विकास खुंटला आहे. देव, धर्म व सदाचार यांची अवहेलना होत आहे. सध्याच्या काळांत असे जीवन अपरिहार्य झाले आहे. व्यवहारिक मानसिक जीवन गुंतागुंतीचे व कष्टप्रद झाल्यानें जगणे व्यर्थ झाले आहे. अस्मिता, स्वाभिमान यांचा लोप होऊन माणूस ढोंगी, धूर्त व लाचार बनला आहे. गुणापेक्षां अवगूणपूजा वाढली आहे.

परस्पर अविश्वासानें मानवजात जहरी व दुष्ट बनली आहे. उच्चतर नैतिकता व संस्कृतीस समाज पारखा झाला आहे. अशा बाजारी भुतांना विशुद्ध अध्यात्म कसें कळणार. अंगांतुकाचे नाटकी अवसान व रणवीराचे असामान्य धैर्य यांत जमीन अस्मानाचे अंतर असतें,

अशा धोकेबाज परिस्थितींत श्रद्धेची व सबूरीची अत्यंत आवश्यकता आहे. भवसागरांतून तारणारा हा महामंत्र बाबांनी आपणास सांगितला आहे. पण गीता, ही गाढवासाठीं नसते, हेंही ध्यानांत ठेवलें पाहिजे. A Davil's Hospital Cannot be a God's Paradise-

आशेन, मोहाने दुःखित व व्याकुळ झालेली मानवता सावलीच्या शोधांत आहे. शरीरव्यथा मनोव्यथा व आत्मव्यथा, या दुर्बलतेपासुन रक्षण करणारी उपाय-योजना 'श्रद्धा व सबुरी'नेंच पूर्ण होऊं शकते. हे महान् वृक्ष भवतापानें शिणलेल्या व वाटचालीनें थकलेल्या पथिकांना आश्रय देण्यासाठीं चिरकाल उभे आहेत.

केवळ पूजा व खुशामत यांनीं यश-सांगता होत नाहीं. उपचाराची ही बाह्य साधनें तत्कालिक फायद्याची असतात. भगवंतांनी विराटरूप दाखवितांच अर्जुन भ्याला. पण त्यामुळेंच त्याचा अहंकार व ममत्व नाहींसें होऊन तो युद्धास प्रवृत्त झाला. कर्तव्यनिष्ठेचें पालन करण्यासाठीं उग्ररूप धारण करणें हें प्रसंगीं हितावह असतें हा बोध यापासून मिळतो. चंद्र, सूर्य पृथ्वीच्या कल्याणासाठीं प्रकाशाचे दान करतात. मेघ मानवाच्या सेवेसाठीं सर्वस्व अर्पण करतात, त्याप्रमाणें आपण आपलें सामर्थ्य व बुद्धि जनतेच्या कल्याणासाठीं खर्च केल्यास आपण साईबाबांची खरी सेवा करूं शकूं. 'श्रद्धा व सबुरी' हे भक्ति पुरुषाचे दोन हात आहेत, या दोन हातांनी कष्टांचा गोवर्धन पर्वत उचलून या सभोवताच्या गोकुळाचें रक्षण करणें हें श्रीबाबांच्या प्रत्येक भक्ताचें ब्रीद आहे.

# बाबांची शिकवण

—लेखक : प्र. श्री. जठार

श्रीसाईबाबा नेहमीं स्वतःला "यादेहक" म्हणजे ईश्वराचा दास म्हणत असत. योगीराज कृष्ण परमात्मा सुद्धां अर्जुनाला आपलें स्वतःचें रूप दाखवितांना विराटरूप घेते झाले. ते स्वतः विश्वरूप असतांना स्वतः देव म्हणून कधीं पांडवांत वावरले नाहींत. त्यांनीं तर एका गवळ्याचें रूप घेतलें होतें. त्यांनीं कधीं पांडवांना सांगितलें कां कीं, "बाबा रे, देव देव म्हणतात तो मीच बरें का" असें जर त्यांनीं सांगितलें असतें तर केवढा गोंधळ झाला असता! गोपींना तर तो आपला सवंगडीच वाटावयाचा.

तुकाराम महाराज म्हणतात—

चारी देव ज्याची कीर्ति वाखणिती ।
बांधवी तो हातीं गौळणीच्या ॥

गौळणिया गळां बांधिती धारणीं ।
पाया चक्रपाणी लागे तया ॥

न ये क्षणभरी योगियांच्या ध्यानीं ।
धरीती गौळणी भाविका त्या ॥

कवतुक केलें सोंगे बहुरुप ।
तुका म्हणे बाप जगाचा हा ॥

म्हणूनच बाबांनीं स्वतःला कधीं "अनिल हक्क" म्हणजे ईश्वर मीच स्वतः आहे, असें म्हणून घेतलें नाहीं.

संतांचें मुख्य कार्य लोकसंग्रह करावयाचा, म्हणजे बहुजन समाजाला भक्ति-मार्गाला लावावयाचें, ईश्वराचें दर्शन करून द्यावयाचें तें काम बाबानीं अतिशय उत्तम व सोप्या तऱ्हेनें केलें.

"जो जो मज भजे जैशा जैशा भावें ।
तैसा तैसा पावें, मीहि त्यासी ॥

काय सुंदर बाबांचा वर आहे! तुम्हांला धन पाहिजे ना? मग चला, बाबांची सेवा करा. तुम्हाला रग्गड पैसा मिळेल. आजकाल सर्व गोष्टी पैशानें साध्य होतात;

मग करा बाबांची भक्ति; पण बाबांवर तेवढी भक्ति पाहिजे. नाहींतर सर्व फुकट. जर जरी शंका आली तर सर्व फुकट जाईल. श्रद्धा म्हणजे भरंवसा आणि भरंवसा म्हणजेच "भक्ति." भक्ताला ह्या जगांत काय कमी आहे?

श्री तुकाराम महाराज तेरा दिवसपर्यंत नदीकाठीं अन्नपाण्याशिवाय फक्त 'सबुरी' धरून वाट पहात स्वस्थ बसले होते तेव्हां—

उदकीं राखिले कागद, चुकविला जनवाद ।
तुका म्हणे ब्रीद साच केलें आपुलें ॥

हा चमत्कार झाल्यावर मात्र तुकाराम महाराजांना वाईट वाटलें. दुसरा कोण जर असता तर गर्वानें फुगून गेला असता. बाबांना पण अशा तऱ्हेचा हटयोग आवडत नव्हता.

**तुकाराम महाराज म्हणतात—**

कापो कोणी माझी मान सुखें पिडो त दुर्जन ।
तुज होय शीण तें मी न करी सर्वथा ॥
चुकी झाली एकवेळा, मजपासूनि चांडाळा ।
उभें करोनियां जळामाजी वह्या राखिल्या ॥
नाहीं केला हा विचार माझा कोण अधिकार ।
समर्थासी भार न कळे कैसा घालावा ॥
गेलें होऊनियां मागें नये बोले तें वाउगें ।
पुढिलिया प्रसंगें तुका म्हणें जाणावें ॥

बाबा म्हणत "अल्ला मालीक सब ठीक करेंगा" आतां गंमत बघा. आम्ही मोठ्या आशेनें साधु-संतांकडे जावें व त्यानें देवाकडे बोट दाखवावें. वा छान जबाब आहे! आम्हांला वाटलें साधुसंत मानवांची सर्व दुःखें नाहींशी करतात आणि इकडे तर बाबा सांगतात "अल्लामिया सब ठीक करेंगा" "राजाराम राजाराम" जप करा हें कोडें मात्र पुष्कळांना श्रद्धेभभावीं कळलें नाहीं. ह्यांतलें मर्म श्रीतुकाराम महाराजांच्या शब्दांत सांगावयाचें तर असें:—

तुका म्हणे वर्म भजनेंचि सांपडे ।
येरांसी तों पडे ओस दिशा ॥


ईश्वराचें नाम चिंतन हे नवविध भक्तिचें एक मुख्य अंग आहे.

बाबांनीं अगदीं सोपा भक्तिमार्ग भक्तांपुढें ठेविला. फक्त "साई-साई" म्हणा कीं काम झालें. किती सोपा उपाय आहे! भक्ति ही

एक नागीण आहे. नरमगरम अंगाला गार गार लागणारी, सुखकारक पण जर काय तिनें अंगाला एकदां दंश केला कीं अंग काळें, निळें पडून जातें. भक्तिचें विष एकदां बाधलें कीं भक्तांचे डोळे चक्क उघडतात. आपल्या स्वतःमध्यें व विश्वांत एकच शक्ति भरून राहिली आहे व आपण त्या शक्तीचा एक अंश आहोंत हें एकदां जाणवूं लागलें कीं, तो विश्वस्वरूप अनुभवूं शकतो. माझा मीपणा जातो व तूंही, तूंही अकेला असा साक्षात्कार होतो. आणि हा अनुभव, उपरती आपल्या भक्ताला यावी म्हणून बाबा म्हणतात "यादे इक."


# जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान करण्यासाठीं बलवान व्हा.** यासाठीं नियमित व्यायाम आणि खेळ खेळणें जरूर आहे. यासाठीं लागणारी उपकरणें म्हणजे डंबेल्स, लेझीम...यासारखा सर्वश्रेष्ठ माल आम्ही बनवितो. नगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती, व्यायाम शाळा, विकास केंद्रें यांना माल पुरवितो.



**लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स,** ८५ बापू खोटे स्ट्रीट, जांभळी मोहोल्ला, मुंबई ३

प्रोप्रायटर—डी. एच्. साखरकर

# श्रीदत्तस्तोत्र ।

१ विरिंचि–विष्णु–त्रिपुरांतकांचें । दावावया ऐक्य जगास साचें ॥
त्रिमूर्ति झाले अवनीवरी या । प्रणाम त्या श्रीगुरुदत्तराया ॥

२ घेती गुण ग्राह्य दिसून येतां । जडांतलाही, त्यजुनी अहंता ॥
चोवीस ऐसे गुरु लाभले ज्यां । प्रणाम त्या श्रीगुरुदत्तराया ॥

३ कौपीन–कंथा कथिती विरक्ति । त्रिशूल ज्यांचा खलनाश–वृत्ति ॥
सम वही धेनु–शुनी, जगा या । प्रणाम त्या श्रीगुरुदत्तराया ॥

४ दयाळु दीनास्तव जे भ्रमन्ती । सदैव या भूवरती करीती ॥
मुमुक्षुजीवां पथ दाखवाया । प्रणाम त्या श्रीगुरुदत्तराया ॥

५ पाहूनि आत्यंतिक शुद्ध भाव । जे आर्त–हांकेस्तव घेति धांव ॥
भक्ताप्रती संकटिं हात द्याया । प्रणाम त्या श्रीगुरुदत्तराया ॥

६ चराचरा व्यापुनि जे रहाती । नेत्रा परी या न दिसून येती ॥
निःसीम भक्ती परि भेटवी ज्यां । प्रणाम त्या श्रीगुरुदत्तराया ॥

७ ज्याची रवीन्दूसम अंगकांति । विलोकितां नेत्र निवून जाती ॥
न पापण्या भान उरे मिटाया । प्रणाम त्या श्रीगुरुदत्तराया ॥

८ हें स्तोत्र जो गाईल नित्य नेमें । भावें, करूनी सकल स्वकर्मे ॥
श्रीदत्त त्या सत्वर पावतील । नतस्तवा कोण न हो भुकेला ? ॥

—:०:—

## श्रीदत्त स्तोत्ररहस्य

१ ब्रह्मा, विष्णु, व महेश हीं एकाच परमेश्वराचीं रूपें आहेत. तो जगाची उत्पत्ति करतो तेव्हां त्याला ब्रह्मा म्हणतात. पोषण–संरक्षण करतो तेव्हां विष्णु व संहार करतो तेव्हां शंकर त्याला म्हणतात. घरांत गृहणी एकच असतें पण पतीची स्त्री, अपत्यांची माता व दासदासींची धनीण असतें त्याप्रमाणें एकच परमेश्वर ब्रह्मा–विष्णु शंकर–रूपानें नटला आहे असें दाखविण्यासाठीं त्रिमूर्तिरूपानें अवतरणाऱ्या हे श्रीगुरु दत्तराया आपणांस प्रमाम असो.

२ पृथ्वीवर संचार करतांना जेथें जेथें घेण्याजोगा गुण दिसला तो आपण उचललांत. सचेतनापासून तसाच जडापासूनहि आपण ग्राह्य गुण घेतलांत. असे. प्रमुख चोवीस गुरु आपण केलेत. त्यांतील कांहीं गुणांचें दिग्दर्शन :–(१) पृथ्वीपासून

क्षमाशीलता, नांगरली, जाळली तरी पीक देते. (२) वृक्षापासून परोपकार, तो पांथस्थाला छाया, फुलें, फळें, झोंपडी बांधायला फांद्या पानें, शेकोटीसाठीं पाला पाचोळा, स्वयंपाकासाठीं सरपण इत्यादि देतो. (३) आकाशापासून असंगत्व—निर्लेपता ढग कोरडे येवोत अगर पाण्याचे येवोत किंवा न येवोत त्यांच्या संगानें तें राहात असूनहि त्याला त्यांचें सुखदुःख नाहीं. त्याच्यावर कांहीं परिणाम होत नाहीं. (४) कपोतकपोतीपासून कुटुंबीयाबद्दल अत्यासक्ति ठेवूं नये. ती दुःखास कारण होते हे श्रीगुरु शिकले. (५) सिंधूपासून गांभीर्य—पावसाळ्यांत नद्यांनीं पाण्याचे लोटच्या लोट आणून ओतले तरी उन्हाळ्यांत अगर हिंवाळ्यांत त्याची जी वृत्ति असते तिच्यांत फरक होत नाहीं. ( ६ ) मधमाशीपासून सद्गुणसंग्रह ( ७ ) अर्भकापासून निश्चिंतता ( ८ ) शरकारापासून एकाग्रता इ. ( तपशील भागवत ११ स्क. ७ अ. यांत पहावा. )

३ आपण परिधान केलेली कौपीन व खांद्यावर टाकलेली झोळी आम्हांस विरक्त होण्यास शिकवतात. हातांत धरलेला त्रिशूल दुष्टांचें निर्दलन करावयास प्रेरणा देतो व आपल्याबरोबर असलेली गाय व कुत्री सांगतात कीं, माणसांवर करतां तसेंच प्रेम मुक्या व हीन जातीच्या प्राण्यांवरहि करा.

४ संसारतापानें तापलेल्या व जन्ममरणपरंपरेतून सुटण्यास उत्कंठित झालेल्या जीवांची प्राथमिक तयारी झाल्यावर त्यांना मार्गदर्शक गुरुची जरूर असते. अशांना अनुग्रह देण्यासाठीं आपण पृथ्वीवर नित्य संचार करीत असतांना मुमुक्षु दीनांविषयीं आपण दयाळु असून आपलें त्यांच्यावर पूर्ण लक्ष असतें. बाळाच्या जन्माबरोबर त्यासाठीं मातृस्तनांत दूध उत्पन्न होतें त्याप्रमाणें मुमुक्षूची उपासना—नामस्मरणादि—परिपक्व झाली कीं सदगुरू त्याला भेटतातच.

५ भक्ताचा भाव शुद्ध आहे, व्यापारांतील सौद्याचा नाहीं असें पटतांच आपण त्याच्या आर्त हांकेस ' ओ ' देऊन संकटांत धांवून जातां व त्यास त्यांतून सुरक्षित बाहेर काढतो.

६ श्रीदत्तगुरु खरोखर पाहिले तर स्थावर—जंगमांत सर्वत्र व्यापून राहिले आहेत. पण सामान्य माणसाच्या चर्मचक्षूला ते दिसत नाहींत. त्यांची अनन्य भक्ति करील त्याला मात्र जळीं स्थळीं काष्ठीं पाषाणीं—सर्वभूतांत इतकेंच नव्हे तर स्वतःचे देहांतहि श्रीदत्तगुरु दिसतात. डोळे अधु असलेल्या माणसास चष्मा लावला म्हणजे नीट दिसतें तसें अनन्य भक्तीनें ज्ञानचक्षु उघडला जातो व भक्ताला आपलें दैवत सर्वत्र दिसूं लागतें.

७ श्रीदत्तगुरूंची सूर्यचंद्रासारखी तेजस्वी व शीतलहि—अंगकांति पाहून नेत्रांचें पारणें फिटतें. तें रूप पाहात असतां इतकी तन्मयता होते कीं पापण्या आपला स्वभावधर्मंहि—उघडझांप—विसरून जातात. सर्वांगाचें नेत्र करून जणूं भक्त श्रीगुरुरूप हृदयांत सांठविण्याचा प्रयत्न करीत असतो.

८ हें स्तोत्र जो कोणी श्रद्धेनें व नियमानें पठण करील व आपलीं वर्णाश्रमानुसार प्राप्त कर्तव्येंहि नीट पार पाडील, त्याला श्रीदत्तगुरू लवकरच भेटतील व त्याचेवर कृपा करतील. नम्र होऊन स्तुति करणाऱ्याविषयीं कोणाला कळवळा येत नाहीं ? 'स्तवप्रियः' हें भगवान् विष्णूच्या सहस्रनामांपैकीं एक आहे.

रचनाकारः—चि. के. छत्रे

## फुललें नंदनवन शिरडींत

फुललें नंदनवन शिरडींत अघटित किमया साईची
दूरदूरूनी भक्त धांवती वंदिती धूळ पायींची ॥
पाणीयानें दीप उजळुनी प्रकाश केला राउळीं
टांगियेली फळी वीतभरी निजे तियेवरी माउली ॥
राम, कृष्ण, शिव, विठ्ठल, रूपें भक्तां दावियलीं
नाना अनुभव आले ज्यांनीं माउली पुजियेली ॥
मानवाच्या देहें आलें परब्रह्म भूतळीं
उद्धारिले भाविक जन जे आले हो पदतळीं ॥
पंढरपूरचा आला विठोबा आला कान्होबा भूवरी
चिलिम शोभे करीं साईच्या श्रीहरीची जणूं बांसरी ॥
अयोध्येला राम जसा हो गोकुळाला श्रीहरी
शिरडीग्रामीं साई तैसा दीनांचा कैवारी ॥
तीर्थांचें आगर शिरडी पतितपावन झाली
भक्तांसाठीं गंगामाई साईचरणीं धांवली ॥
रावरंक समसमान. जातीभेदा मूठमाती
मशिदीं, मंदिरीं नाम गर्जले साईचें दीनदाता ॥
पापांचें हो करीत क्षालन धगधग धुमसे धुनी
विभूत साईची शुद्ध रूपें आली हो प्रगटुनी ॥
मंत्र साईचा जतन करा हो श्रद्धा आणि सबूरी
करिल भलें हो अल्ला तुमचें आस बाळगा उरीं ॥

—पांडुरंग दीक्षित

# डाकोरचे संत रामदास

द्वारकेपासून सुमारें दीडशें कोसावर डाकूर म्हणून एक गांव आहे. त्या ठिकाणीं रामदास या नांवाचा एक ब्राह्मण रहात असे. तो मोठा ज्ञानी होता. तो कोरान्न मागून आपल्या कुटुंबाचें संरक्षण करीत असे. तो सर्वकाळ निराश व संतुष्ट असे. तो मोठा निष्ठावंत असल्याकारणानें एकादशीला द्वारकेची वारी करीत असे. सायाच्या कोरलेल्या वृंदाकनांत तुळशीचें झाड लावून तो तें आपल्याबरोबर वागवीत असे. सासुरवासानें पीडित झालेल्या सासुरवासिनीला माहेर दृष्टीस पडतांच जसा आनंद होतो त्याप्रमाणें द्वारकेचें दर्शन होतांच रामदासाला प्रेमाचा हुंदका येत असे. जन्ममरण खंडण्याकरितां वैकुंठनाथाची सद्भावानें पूजा करण्यांत त्यानें पंचवीस वर्षें घालविलीं. वाऱ्याकरितां त्याचे काळे केस पांढरे झाले. वृद्धपणामुळें शरीर जर्जर झालें असं पाहून तो एका वारीच्या प्रसंगीं श्रीकृष्णास हात जोडून म्हणाला, "हे देव देवेशा, आतां मला वारी करण्याची ताकद नाहीं. हें तुझें शेवटचेंच दर्शन होय. मजवर नेहमींप्रमाणेंच लोभ असू दे. मी तुझा अनन्य सेवक आहे."

इतके शब्द उच्चारतांच त्याच्या नेत्रांतून अश्रु वाहूं लागले. भक्ताचे प्रेमाश्रु पाहतांच प्रभूचा कंठ सद्गदित होऊन प्रभूनें रामदासाला अलिंगन दिलें. आपला भक्त आतां पुन्हा आपणास भेटणार नाहीं असें ऐकून भावी वियोगाच्या दुःखानें देव व्याकूळ झाले. त्यानें रामदासाला सांगितलें, "रामदासा; तुझें सेवा ऋण फार झालें आहे. मला तुझा वियोग सहन होणार नाहीं. तूं आपल्याबरोबर मला डाकुरास घेऊन चल. माझ्या रथाला घोडे जुंप. मला त्यात बशीव आणि तूं आपल्या बरोबर घेऊन चल."

कृष्णाच्या सूचनेप्रमाणें रामदासानें कृष्णमूर्ति उचलून रथांत घातली आणि तो डाकुरास येऊन पोहोंचला.

सकाळच्याप्रहरीं द्वारकेमध्यें पुजारी आरतीकरितां देवळांत येतात तों मूर्तीच नाहींशी झालेली. हा चमत्कार पाहून सर्व लोकांना आश्चर्य वाटलें. कोणी तरी मूर्ति चोरून नेली असावी असें निश्चित होऊन नानातर्क चोरून नेली असावी असें निश्चित होऊन नानातर्क चालू झाले. दर्शनाला येणाऱ्या रामदासानेंच मूर्ति नेली असा संशय आला. डाकुरच्या वाटेनें रथचक्राचे वण पाहून ती शंकाच बळकट झाली. पुजाऱ्यांनीं तात्काल डाकुरची वाट धरिली. आपला शोध करण्याकरितां द्वारकेहून लोक आले आहेत असें कळतांच रामदासानें ती मूर्ति तळ्यामध्यें टाकून दिली. पुजाऱ्यांनीं रामदासास चोर म्हणून पकडलें. त्यानें चोरी सपशेल नाकारली. पुजाऱ्यांनीं

त्याच्या घराचा झाडा घेतला. झाड्यामध्यें मुद्देमाल न सांपडल्यामुळें त्यांनीं रामदासास सोडून दिलें. आपली चोरी उघडकीस येऊं नये. या हेतूनें रामदासानें देवाची मूर्ति कोठेंतरी लपविली असेल अशा कल्पनेनें पुजाऱ्यांनीं गांवांतील आड, विहिरी शोधून पाहिल्या. पण मूर्तीचा थांग लागेना. शेवटीं पुजारी लोकांनीं गांवाबाहेरील सरोवर शोधण्याकरितां त्यांत बरच्या घालून पाहिल्या. त्यांतील एक बरची देवांच्या अंतःकरणास लागून तेथील रक्तानें पाणी रंगलें. तें पाहतांच त्यांनीं त्या सरोवरांत पानबुडे घालून रणछोडाची मूर्ति बाहेर काढली. मूर्ति सांपडतांच पुजाऱ्यांना आनंद झाला. ते लागलीच ती मूर्ति द्वारकेस नेऊं लागले. तें ऐकून रामदास अत्यंत कष्टी झाला. आपण ज्याच्याकरितां असत्य बोललों; ज्याच्यावांचून आपल्याला मुळींच चैन पडणार नाहीं त्याला पुजारी द्वारकेस नेत आहेत, या चिंतेनें व्याकूळ होऊन तो ईश्वराची मनोमन प्रार्थना करूं लागला. भगवंतांनीं त्याच्या मनांत प्रवेश करून त्याला असें सांगितलें कीं, "रामदासा, तूं स्वस्थ ऐस. मी अक्षय तुझ्याजवळच राहावयास येतो. माझ्या भारंभार सुवर्ण देण्याचें कबूल करून पुजाऱ्यापासून तूं मला विकत घे. तूं घालशील तेवढ्याच सोन्याच्या वजनाइतका मी जड भरेन."

भगवंताच्या युक्तिप्रमाणें रामदासानें पुजाऱ्यांना भारंभार सोनें देण्याच्या अटीवर रणछोडमूर्ति विकत घेण्याचें ठरविलें. रामदासासारखा कंगाल इतकें सोनें देणारच नाहीं अशा खात्रीनें त्याच्या समजुतीकरितां पुजाऱ्यांनीं त्याची अट पत्करली.

ठरलेल्या करारांत पुढें भानगड पडूं नये म्हणून गांवांतील कित्येक लोक साक्षीस आणून घट रोविला. एका पारड्यांत रणछोडाची मूर्ति ठेविली आणि दुसरें पारडें रामदासाच्या ताब्यांत दिलें. ज्याच्या घरांत खायला अन्नहि नाहीं तो रामदास आतां दुसऱ्या पारड्यांत इतकें सोनें कुठलें टाकतो तें पाहाण्याकरितां लोक अती उतावीळ झाले होते. कोणी कोणी त्याची थट्टा करीत होते कोणी कोणी त्याला मूर्ख, वेडा असे किताब देत होते. दरिद्री माणसाबद्दल त्यांची कल्पना बरोबर होती. पण ज्यानें आपल्या भक्तीनें श्रीकृष्ण वश केला त्याच्या ठिकाणीं दारिद्र्य वसणें शक्यच नाहीं. हें त्या अभाविकांच्या ध्यानांत यावें कसें. अठराविश्वे दारिद्र्याच्या घरीं वाण देण्यास समुद्रतनया आली असतां त्यास सोन्याला काय तोटा? रामदासानें आपलें घर धुंडाळून पाहिलें तों बायकोच्या नाकांतील नथेवाचून सोन्याचा कांहींच जिन्नस त्याला सांपडेना. अखेर ती नथ मोकळी करून त्यानें नथेचा सोन्याचा गाडा त्या पारड्यांत टाकला आणि मोठ्या शुद्ध भावानें देवाची विनवणी केली. तो मनामध्यें म्हणाला, "परमेश्वरा, तुला सत्यभामेनें नारदाला दान दिलें, त्यासमयीं तूं यःकश्चित् तुळशीपत्र घेऊन रखमाबाइला यशस्वी केलेंस. मी तर रुक्मिणीपेक्षां किती तरी दीन आहें. यावेळीं माझा अभिमान धर."

अशी प्रार्थना करून त्यानें तो वालभर गाडा पारड्यांत टाकतांच देवाचें पारडें वर गेलें. हा चमत्कार पाहून आकाशांतून रामदासावर पुष्पवर्षाव झाला. पुजाऱ्यांचा पराजय होऊन ते द्वारकेस चालते झाले. त्यांनीं द्वारकेच्या देवळांत दुसरी मूर्ति बसविली. रामदासानें विकत घेतलेली मूर्ति डाकुरास स्थापिली. सर्व लोकांना रामदासाचें भक्तिरहस्य समजून ते त्याच्या भजनीं लागले. रामदासानें स्थापलेली मूर्ति अद्याप डाकुरासच आहे. द्वारकेच्या यात्रेला जाणारे लोक अजूनपर्यंत प्रथम डाकुराच्या मूर्तीचें दर्शन करून मग पुढें द्वारकेस जातात ही गोष्ट सर्वत्रास महशूरच आहे.

## माझ्या शिरीं साईचा हात

माझ्या शिरीं साईचा हात, बाबांचा हात,
साई नाम मुखांत, माझ्या साई नाम मुखांत ॥

माझ्या सवें साई दिनरात,
कलिकालाचें, भय न कुणाचें, दौलत साईनाथ
माझी दौलत हो साईनाथ ॥

मी दंग नामरंगांत
आनंद रोमरोमांत
तनु पुलिकित ही निमिषांत
ती चिलीमधारी मूर्ती साजरी भरली नयनांत ॥

मजवरी केली खैरात
मज रोज नवा दृष्टांत
मन रमे भक्तिभावांत
डुबतें ऐसी प्रेमरसाच्या दिव्य

# ४८ वा पुण्यतिथी महोत्सव

## ( अहवाल शके १८८८ )


श्रीसाईबाबा यांचा ४८ वा पुण्यतिथि उत्सव सालाबादप्रमाणें यंदा झाला. उत्सवास नागपूर, वऱ्हाड, खानदेश, अहमदाबाद ( गुजराथ ) मुंबई, पुणें, मद्रासप्रांत, आंध्रप्रांत, म्हैसूरप्रांत, मध्यप्रदेश, हैद्राबाद वगैरे प्रांतांतून बरेच साईभक्त आले होते.

उत्सवास आरंभ मिती आश्वीन शु. ९ दिनांक २२ आक्टोबर १९६६ शनिवार पासून सुरूं होऊन मिती आश्वीन शु. १० सह एकादशी दिनांक २४ आक्टोबर १९६६ सोमवार रोजी गोपाळकाला, कीर्तन, दहींहंडी होऊन उत्सव समाप्त झाला.

उत्सावाचा कार्यक्रम सालाबादप्रमाणें पोथीची मिरवणूक, कीर्तन, सामदायिक पूजा, अभिषेक, पालखीची गांवांतून मिरवणूक, मुख्य दिवस दिनांक २३ आक्टोबर १९६६ रविवार या दिवशींचा कार्यक्रम सालाबादप्रमाणें पोथीची परत मिरवणूक, सामुदायिक अभिषेक पूजा, श्रीसाईबाबा पुण्यतिथी कीर्तन, प्रसाद रूपानें कापडाची विक्री, भिक्षेची मिरवणूक, आराधना विधी, सायकाळी सिमोल्लंघन मिरवणूक, शमीपूजन, श्री. माननीय कोर्ट रिसीव्हर भा. ग. पोतनीससाहेब यांचे हस्ते झालें. रात्रौ श्राचे रथाची मिरवणूक, कलाकारांच्या गायन, वादन, इजऱ्या रात्रभर जागरण. मंदिर अवघ्यांना दर्शनार्थ खुलें होतें. तिसरे दिवशीं नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त भक्तांच्या सामुदायिक पूजाअभिषेक, गोपाळकाला कीर्तन, दहीहंडी, माध्यान आरती तीर्थप्रसाद होऊन उत्सव समाप्त.

उत्सवांत तीन दिवस भक्तांना नेहमींच्या दरांत पक्कान्नांचे भोजन संस्थानकडून भोजनगृहामार्फत देण्यांत आलें. तसेंच तीन दिवस चहा, लाडू, चिवडा इ. फराळ सर्व संस्थान नोकर सेवेकरी प्रतिष्ठीत पाहुणे यांना देण्यात आला.

अशा रीतीनें पुण्यतिथी उत्सव उत्तम प्रकारे साजरा झाला. उत्सवाची सर्व व्यवस्था मे. कोर्ट रिसीव्हर भा. ग. पोतनीससाहेब यांचे देखरेखीखाली सर्व खाते-प्रमुखांनीं उत्तम ठेवली होती.






# ऑक्टोबर १९६६

या महिन्यांत भक्तांची गर्दी नेहमीप्रमाणेंच होती; कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली ती खालीलप्रमाणें.

**कीर्तन**

ह. भ. प. पांडुरंग शंकर चंदिरे मु. अमळनेर.

ह. भ. प. दत्तुबुवा महाजनी, कुर्ला–मुंबई.

संस्थान गवई विठलराव मराठे यांचीं कीर्तनें नेहमीप्रमाणें झालीं.

**प्रवचन**

ह. भ. प. नथु शिवाजी बहिःस्कार मोझरकर ( बाबा ) मोझर ( विदर्भ )

श्री. एकनाथी भागवतावर ( प्रवचन झालें )

श्री. ह. भ. प. डॉ. के. बी. गव्हाणकर, कुर्ला–मुंबई ( प्रवचन )

**गायन**

सौ. जयमाला जयराम शिलेदार. पुणें, श्री. मारुतीबुवा बागडे, मुंबई. श्री. बबन शेळके, श्री. तुळशीराम दीक्षित कुर्ला, श्री. राममोहन शुक्ल अंधेरी, श्री. सौ. मिराबाई राजगोपाळ स्वामी, खार मुंबई, श्री. उत्तरेश्वर चौगुले, बार्शी ( सोलापूर ), सौ. सरलाबाई, हैद्राबाद.

**भजन पार्टी**

श्री. माधवन् आणि भजनपार्टी–मद्रास, श्री. दिनकरराव गेनुजी शिंदे, मुंबई

**नृत्य**

कल्पना डॉन्सिग पार्टी पुणें, कर्वेरोड विविध ( कार्यक्रम )

**नकला**

श्रीसाईनाथ प्रासादिक न्यूकला मंडळ शिर्डी

**कोजागिरी पौर्णिमा**

श्री. डॉ. के. बी. गव्हाणकर आणि भजनी मंडळी कुर्ला यांचें सालाबादप्रमाणें

रात्रौ कीर्तन भजन रात्रभर जागर, चंद्रपूजा, तुळशीअर्चन झालें व भक्तांमार्फत दूध प्रसाद वाटण्यांत आला.

**मोठ्यांच्या भेटी**

( १ ) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी साईमंदिरास भेट देऊन दर्शन घेतलें.

( २ ) श्रीमती सदालक्ष्मी, समाजकल्याण, आंध्र प्रदेश.

✶

# नोव्हेंबर १९६६

या महिन्यांत शिर्डीस भक्तांची गर्दी दिवाळीचे सुट्टीमुळें नेहमीहून जास्त प्रमाणांत होती. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली ती खालीलप्रमाणें:—

**कीर्तन**

श्रीमती कृष्णाबाई येवलेकर, सातारा. सं. गवई विठ्ठलराव मराठे यांचीं कीर्तनें नेहमींप्रमाणें झालीं.

**गायन**

श्री. नन्हे बाबू कुंवर माणिककर ( गायन हार्मोनिय ) ( शास्त्रीय गायन—वादन पटु ) प्रिन्सिपाल श्रीगुरु संगीत विद्यालय ( चौव्हारेकेबाद ) मु. बिहर म्हैसूरप्रांत.

सौ. विजया बाळकृष्ण पतकी, दादर मुंबई.

श्री. एस. एस. दिक्षीत मोहळ, ( सोलापूर ).

श्री. एस. एन्. वैनारजी, रोडकेला, ( उडीसाप्रांत )

श्री. एस. व्ही. सुब्रह्मण्यम् मद्रास.

**प्रवचन**

श्री. ह. भ. प. दत्तात्रय विनायक सबनीस ( विजयनगर ) पो. मलठण, व्हाया दौंड, जि. पुणें.

**साईनाथ संस्थान नोकर भजन मंडळ**

या महिन्यांत संस्थान नोकर भजन मंडळ कार्यक्रम ( एक ) झाला मे. माननीय रिसीव्हर भा. ग. पोतनीससाहेब स्वतः हजर राहून भजनांत भाग घेऊन मार्गदर्शन केलें.

**दिपवाळी**

सालाबादप्रमाणें श्रींचे समाधी मंदिरांत श्रीलक्ष्मी पूजन मोठ्या थाटांत झालें. दिव्यांची रोषनाई व शोभेची दारू भक्तांनीं उडविली.

कार्तिकी महाएकादशीनिमित्त सालाबादप्रमाणें श्रींचें पालखीची गांवांतून मिरवणूक, गारुडभारुड व कीर्तन झालें.

## तुळशी विवाह

सालाबादप्रमाणें श्रींचे द्वारकामाईत तुळशीलग्न मोठ्या थाटात झाले. या कार्यक्रमात मे. माननीय कोर्ट रिसील्व्हरसाहेब हजर होते.

## मोठ्यांच्या भेटी—

(१) मे. जस्टीस मुधोळकर साहेब, दिल्ली. अभिषेक सत्यनारायण पूजा केली.
(२) मे. गोडसेसाहेब चारिटी कमिशनर साहेब (श्रीसाईबाबा दर्शन)
(३) मे. करंदीकर साहेब डीन मेडिकल कॉलेज औरंगाबाद ,,
(४) मे. ना. राजारामबापू पाटील, म. मंत्री. म. रा. ,,
(५) मे. ना. टी. रामस्वामी (सहकार मंत्री) आंध्रप्रदेश ,,
(६) मे. विनायकराव पाटील (अध्यक्ष) महाराष्ट्र काँग्रेस प्रांतिक ,,
(७) मे. देशपांडे साहेब, डी. एस. पी. सोलापूर ,,
(८) मे. मिसेस के. सी. रेड्डी लेडी गव्हर्नर भोपाळ ,,
(९) मे. महाराजा उदयपूर ,,
(१०) मे. जे. एन्. मेहरा, डी. आय. जी. ट्रॅफिक ब्रँच मुंबई ,,

शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई नाहीं.



ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स
२६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २.
टे. नं. २२८४४
तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण.
होलसेल व रीटेलर्स

# माझी आधळ्याची काठी

माझी आंधळ्याची काठी
साई, तुझी कृपादृष्टी।
पाय आसुनी मी पांगुळा
हात आसुनी झालों लुळा
लळा तुझा जगजेठी।
कान असतां ऐकू न येई
आसुनी जिव्हां शब्द न फुटती
न्याहाळीता मती हो थिटी।
माझ्या रूक्ष संसारांत
ठायीं ठायीं तुझी प्रीत
साई:स्मरण नित्य ओठीं।

—गोविंद केशव पेठकर
(नासिक)




## " साई भक्तांस अमूल्य संधी "

श्री साईलीला १९५८ (त्रैमासिक) एप्रिल ते १९५९ जानेवारी १९५९ (मासिक) एप्रिलपासून १९६५ मार्चपर्यंतचे, थोडे जुने अंक (विशेष अंकासह) शिल्लक असून, ते विक्रीस काढले आहेत. फुटकळ अंकास, (विशेष अंकासह) प्रत्येकीं दोन आणे २. पोष्टेज निराळें. (एक अंकासाठी पोष्टेज १० पैसे,) (दोन अंकास १५ पैसे,) (तीन अंकास २० पैसे,) (चार अंकास २५ पैसे.) वरीलप्रमाणें जुन्या अंकासाठी-किंमत टपाल खर्चासह (स्टँप-तिकिट) अगर मनीऑर्डरनें पाठवावी.

संपादक
श्री साईलीला मासिक